रायगड, शुक्रवार दि. ९ जून २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

समीर वानखेडेंना अंतरिम दिलासा

मुंबई : बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान याच्या सुटकेसाठी २५ कोटी रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपप्रकरणी केंद्रीय अमलीपदार्थ नियंत्रण विभागाच्या मुंबई विभागाचे माजी संचालक समीर वानखेडे यांना अटकेपासून दिलेला अंतरिम दिलासा रद्द करा, अशी मागणी सीबीआयने उच्च न्यायालयाकडे केली होती. परंतु वानखेडे यांना २३ जूनपर्यंत अटक न करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यांना अटकपूर्व जामीन मिळाला होता. हा जामीन आता २३ जूनपर्यंत वाढवण्यात आला आहे. दरम्यान, याचिकेत सुधारणा करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी समीर वानखेडे यांच्या वकिलाने न्यायालयात केली आहे.

१० वी, १२ वी (Sci/Com/Arts) च्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रात करीअरची संधी
ADMISSION OPEN PANVEL - ALIBAUG
गव्हर्नमेंट डिग्री, डिप्लोमा आणि सर्टिफीकेट कोर्सेस
B.Sc. - MLT / RIT / OT (Voc)
DMLT CMLT DRIT
GNM DOTT
Nursing Assit
CRIT

DPMI 9224793344 / 8655197108
India's Leading Health Science Institute

आदिवासीचा मारहाणीत मृत्यू

। पेण । प्रतिनिधी ।

पेण शहर आणि परिसरात अनधिकृत टपरीधारकांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यातून दररोज वादविवादाच्या घटना घडत असतात. गुरुवारी टपरीसमोर एका आदिवासी युवकाने दुचाकी लावल्याने संतप्त झालेल्या टपरीधारकाने केलेल्या मारहाणीत त्या आदिवासीचा मृत्यू होण्याची घटना घडली. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

पेणमधील टपरीधारकांची मुजोरी

पेण पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार रोहन संतोष पवार (वय २३ रा. कामार्ली ता.पेण.जि.रायगड याने आपली नविन केटीएम मोटार सायकल दिपीका नारळ सेंटरच्या (अनधिकृत दुकान) दुकानासमोर लावली त्याचा राग मनात धरून रोहन याला मारहाण केली. या मारहाणीत तो खाली पडला आणि मृत्युमुखी पडला. या प्रकरणी राजेंद्र प्रभाकर बांदिवडेकर याच्याविरूध्द पेण पोलीस ठाण्यात भा.द.वि.सं.क. ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून आरोपीला अटक केली गेलेली नाही. गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ हे करीत आहेत.

पेण नगरपालिका हद्दीतील असणाऱ्या अनधिकृत टपऱ्या, अनधिकृत बांधकाम, अनधिकृत पार्किंग यावर गेले ६ महिने प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी तसेच काही राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आपापल्या परीनेआवाज उठवत आहेत. मात्र, नगरपालिका प्रशासनाकडून काही त्यांच्याविरुध्द कारवाई होत नाही. गेल्या आठवड्यात कारवाई होणार असे समजताच काही नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने रातोरात टपऱ्या व अनधिकृत गाड्याा हलवण्यात आल्या. चार दिवस ओलांडत नाहीत तोच त्या टपऱ्या जशाच्या तशा उभा राहिलेल्या आहेत.

झालेली घटना पेण •➤ पान ५ वर

महिलेच्या मृतदेहाचे तुकडे मीरारोडमधील घटना

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईतील मीरा रोड येथे लिव्ह ईन शिपमध्ये राहणाऱ्या महिलेची तिच्या पार्टनरने हत्या केली आहे. हत्या करुन त्याने मृतदेहाचे छोटे छोटे तुकडे केले. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. मीरारोड मधील नयानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे. महिलेचा खून दोन ते तीन दिवसापूर्वी करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. सरस्वती वैद्य असं मृत महिलेचे नाव आहे. आरोपीला १६ जूनपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

इमारतीत राहणाऱ्या शेजाऱ्यांना दुर्गंधी येत असल्याने त्यांनी नयानगर पोलीस ठाण्यात माहिती दिली. मीरा भाईंदर उड्डाणपूलाच्या शेजारी गीता आकाश दिप बिल्डिंग गीता नगर फेस -७, जे विंग सदनिका क्रमांक ७०४ मध्ये सरस्वती वैद्य यांचा मृतदेह सापडला. मागच्या तीन वर्षांपासून एक जोडपे लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहत असल्याचे पोलीस तपासात उघड झाले. मनोज सहानी (५३ वर्षे) आणि मृत सरस्वती वैद्य हे दोघे या फ्लॅटमध्ये लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. सरस्वती यांचा मृतदेह हा छोट्या छोट्या तुकड्यात कापले असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा नोंद करण्यात आला. सरवस्ती यांचा लिव्ह इन पार्टनर मनोज सहानी याला पोलिसांनी अटक केली आहे. या हत्येचे नेमकं कारण मात्र समजू शकलेले नाही.

मनोज सानेने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार सरस्वतीने ४ जून रोजी विष प्राशन करून आत्महत्या केली होती. त्यादिवशी मी घरी पोहोचलो •➤ पान ५ वर

वे|ध|क

कोल्हापुरातील परिस्थिती नियंत्रणात

कोल्हापूर : कोल्हापूर शहर आणि जिल्ह्यातील परिस्थिती पूर्ववत झाली आहे. ४ एसपीआरएफच्या तुकड्या, ३०० पोलीस कॉन्स्टेबल, ६० पोलीस अधिकारीही तैनात करण्यात आले आहेत, कोल्हापुरात औरंगजेबाचे व्हॉटसॲपला स्टेटस ठेवले असल्याचा प्रकार उजेडात आल्यानंतर पोलीस खातं तत्काळ सक्रिय झालं होतं. मंगळवारपासूनच संपूर्ण जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीत पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. काही गावं बंद करण्याचं आवाहन करण्यात आलं होतं, अशी माहिती कोल्हापूर पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी दिली.

'भाजपच्या विरोधात वीस पक्ष एकत्र'

सातारा : 'कर्नाटकच्या निवडणुकीत मिशन लोटस भाजप यशस्वी करू शकली नाही. त्यामुळे आगामी काळात भाजप व मोदींची जादू चालणार नाही, हे सिद्ध झाले आहे. २०२४ च्या निवडणुकीत मोदींविरोधात २० पक्ष एकत्र येऊन लढणार आहोत. या निवडणुकीत भाजप सत्तेतून हद्दपार होईल,' असा विश्वास माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला. दरम्यान, राज्यात महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणुका लढवल्या जाणार असून, भाजपविरोधात एकच उमेदवार दिला जाईल. येत्या १३ जूनला काँग्रेसची बैठक होणार असून, त्यामध्ये जागांबाबत चर्चा होईल, असे त्यांनी सांगितले. काँग्रेस भवनात आढावा बैठकीनंतर श्री. चव्हाण यांनी संवाद साधला.

भारतात होणार विश्वसुंदरी स्पर्धा

मुंबई : यंदाचा ७१ वा 'मिस वर्ल्ड' स्पर्धेच्या आयोजनाचा बहुमान भारताला मिळाला आहे. तब्बल २७ वर्षांनंतर ही स्पर्धा यंदा भारतात होणार आहे. यापूर्वी सन १९९६ मध्ये भारतानं या स्पर्धेचं आयोजन केलं होतं. यंदा नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये ही स्पर्धा पार पडणार असल्याचं सांगितलं जात आहे. मिस वर्ल्ड ऑर्गनायझर ज्युलिया मोर्ले यांनी सांगितलं की, मला सांगायला आनंद होत आहे की, भारत ७१ व्या मिस वर्ल्ड स्पर्धेच्या फायनलचं नवं घर असेल. मी भारताला ३० वर्षांपूर्वी भेट दिली होती, माझ्यामध्ये भारताबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली, असे त्या म्हणाल्या.

कर्ज फेडण्यासाठी देवांची चोरी

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

लग्न व व्यवसायाकरीता कर्ज फेडण्यासाठी थेरोंडा खंडेरावपाडा येथील मंदिरातील देवांची चोरी करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी मोठ्या शिताफीने तपास करीत आरोपीला पकडण्यात यश मिळविले आहे. तसेच चोरी झालेल्या देवांच्या मूर्ती हस्तगत करण्यात आल्या आहेत.

भरवस्तीत असलेल्या खंडोबा मंदिरात प्रवेश करून चोरट्यांनी गाभाऱ्यातील १,६०,८०० रूपयांचा एकूण ५ किलो ३६० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या मूर्तींची चोरी केली होती. रेवदंडा पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्यांचे विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला होता. पहाटे मंदिरात पुजाअर्चा करण्यास गेलेल्या ग्रामस्थांच्या निदर्शनास चोरीची घटना आली. त्यानंतर तात्काळ रेवदंडा पोलीस ठाणेकडे घडलेल्या चोरीची घटना •➤ पान ५ वर

॥ आरोपी अटकेत, मुद्देमाल हस्तगत

॥ थेरोंडा खंडेरावपाडा येथील घटना

अतिक्रमणाविरोधात धडक कारवाई

चेंढरे ग्रामपंचायतीची मोहीम

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

चेंढरे ग्रामपंचायतीच्या वतीने गुरूवारी अतिक्रमण विरोधी धडक कारवाई मोहीम राबविण्यात आली. रेवस अलिबाग मार्गावरील अतिक्रमण या मोहिमेंतर्गत हटविण्यात आली. फेरीवाल्यांनी व्यापलेल्या बकाल झालेल्या रस्त्याने मोकळा श्वास घेतला. या ग्रामपंचायतीने केलेल्या या कारवाईचे ग्रामस्थांनी स्वागत केले आहे.

ग्रामपंचायत हद्दीतील सर्व प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली होती. लहान मोठ्या टपऱ्या टाकून रस्त्यालगतचा परिसर अडवून धरला गेला होता. अनिर्बंध पध्दतीने फेरीवाले वाढत चालले होते. दिवसभर व्यवसायकरून त्याच ठिकाणी कचरा, मच्छीचे पाणी टाकून परिसर अस्वच्छ केला जात होता. त्यामुळे अलिबाग शहरालगत असलेल्या चेंढरे परीसराला बकाल स्वरून प्राप्त झाले होते.

की बाब लक्षात घेऊन ग्रामपंचायतीच्यावतीने ही अतिक्रमण विरोधी मोहीम सुरु करण्यात आली. आठ दिवसांपुर्वी सर्वांना अतिक्रमणे हटविण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. मात्र तरीही अतिक्रमणे हटविण्यात न आल्याने ग्रामपंचायतीने आज धडक कारवाईला सुरुवात केली. बाफना बाग, रोहिदास नगर, एमआयडीसी कार्यालय परिसर, बिएसएनएल कार्यालय परिसरातील अतिक्रमणांवर यावेळी जेसीबी मशिन चालविण्यात आले. टपऱ्या उखडून टाकण्यात आल्या.

ग्रामपंचायत हद्दीतील सर्व प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमणे अशाच पध्दतीने हटवली जातील अशी ग्वाही यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील आणि उपसरपंच यतीन घरत यांनी यावेळी दिली. दरम्यान या कारवाईचे ग्रामस्थांनी स्वागत केले आहे. चेंढरे ग्रामपंचायतीचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन इतर ग्रामपंचायतींनी अशीच कारवाई करावी अशी मागणी या निमित्ताने करण्यात आली.

या मोहिमेत जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संजय पाटील, सरपंच स्वाती पाटील, उपसरपंच प्रणाली म्हात्रे, ग्राम विकास अधिकारी निलेश गावंड, माजी उपसरपंच ॲड. परेश देशमुख, यतीन घरत, रोहन पाटील, आदींसह सर्व सदस्य कर्मचारी यांच्या उपस्थितीत टपऱ्या हटवण्यात आल्या. कारवाईपूर्वी काही दिवस आधी सर्व अतिक्रमित टपरीधारक यांना ग्रामपंचायतीच्यावतीने नोटीस बजावण्यात आली होती.

पेणमध्ये मंदिरचोरी प्रकरणी परप्रांतियाला अटक

। पेण । प्रतिनिधी ।

पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मंदिरातील चोरी प्रकरणी एका परप्रांतीयाला अटक करण्यात आली आहे. पकडलेल्या चोराचे नाव कमलेश रामकुमार यादव असे आहे. गेल्या चार-पाच महिन्यांपासून चोरट्यांनी आपले लक्ष केंद्रीत केले होते. त्यांना पकडणे हे पोलिसांसमोर आव्हान उभे राहिले होते.

पेण कोळीवाडासारख्या गजबजलेल्या ठिकाणी मंदिरातून चांदीची देवीची मूर्ती चोरीला गेली होती. पोलिसांनी जंग जंग पछाडून चोर काय ताब्यात आला नव्हता. असे असतानाच दोन दिवसापूर्वी रात्री रामेश्वर मंदिर, कासार आळी येथील महाकाली मंदिर, गौतमेश्वर मंदिर आणि भर चावडी नाक्यावरील गणपती मंदिर अशा चार ठिकाणी चोरटयाने काही ऐवज व रोख रक्कमा चोरल्या. मात्र तो सीसी टीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असल्याने २४ तासाच्या आत चोराच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे.

कमलेश रामकुमार यादव हा मुळचा उत्तर प्रदेशचा रहिवाशी आहे. सध्या तो माजी नगरसेवक प्रकाश शिंगृत यांच्या गोठ्यात वास्तव्य करुन आहे. त्याबाबतची माहिती मिळताच गुन्हा प्रकटीकरण पथकाने तपास अधिकारी पी.टी.काले यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीला पकडले आहे. आरोपी हा गेली ४-८ दिवस प्रकाश शिंगृत यांच्या गोठयात कामाला होता. त्याच सुमारास त्याने मंदिरावर डल्ला मारला असल्याचे कबूल केले आहे. •➤ पान ५ वर

पाण्यात बुडून एकाचा मृत्यू

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर मार्गे बोर्ली रस्त्यालगत असणाऱ्या कोंडीवली गावासमोरील समुद्रकिनारी कुटुंबासमवेत फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकाचा पाण्यात पोहताना बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. निलेश शाम मोरे वय वर्ष ३८ असे मृत पावलेल्या पर्यटकाचे नाव असून त्यांच्या समवेत असणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीचा जीव फ्लाईंग बर्ड चे कार्यकर्ते आपले जिवाची पर्वा न करता पोहत जाऊन मृत इसमाच्या सख्ख्या भावाला •➤ पान ५ वर

पावसाने दिली वर्दी मान्सून केरळमध्ये दाखल

मुंबई : केरळमध्ये गुरुवारी मान्सून दाखल झाला आहेत तशी अधिकृत घोषणा भारतीय हवामान विभागाकडून करण्यात आली आहे. एका आठवड्याच्या विलंबानंतर आज केरळात मान्सूनचं आगमन झालेलं आहे. 'बिपरजॉय' चक्रीवादळामुळं १६ जूननंतर मान्सूनचे आगमन होणार असल्याचे सांगण्यात आलं होतं. पण हवामानात मोठे बदल झाला आहे महाराष्ट्रात लवकरच तो दाखल होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. केरळच्या अनेक भागांमध्ये चांगला पाऊस झाला. मान्सूनच्या आगमनानं उष्म्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे. विदर्भाच्या काही जिल्ह्यात पुढच्या तीन ते चार दिवस वादळी वाऱ्यासह यलो अलर्ट देण्यात आला आहे.



मुंबई विद्यापीठात भारतीय शास्त्रीय संगीतात सुवर्णपदक पटकाविणाऱ्या गायिका मुग्धा वैशंपायन यांचा पीएनपीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विक्रांत वार्डे, भगवान वैशंपायन आदी मान्यवर उपस्थित होते.

(वृत्त आणि छायाचित्रे पान ३ वर)

पहिल्या डावात भारताची घसरगुंडी

। लंडन । वृत्तसंस्था ।

ऑस्ट्रेलियाविरुद्ध विश्व कसोटी अजिंक्यपद सामन्यात खेळताना भारताची पहिल्या डावातच घसरगुंडी झाली.शंभरीच्या आतच भारताचे पाच गडी बाद आले.ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४६९ धावांवर मजल मारली. त्याला प्रत्युत्तर देताना मैदानात उतरलेल्या भारताचे सलामीवीर भारताचे दोन्ही सलामीवीर ३० धावांवर माघारी गेल्यानंतर पुजाराने विराटच्या साथीने भारताला अर्धशतकापर्यंत पोहचवले. मात्र पुजारानेही गिलसारखीच चेंडू सोडण्याची चूक केली अन् तो १४ धावांवर ग्रीनच्या गोलंदाजीवर त्रिफळाचित झाला. यानंतर विराट कोहली आणि अजिंक्य रहाणेने डाव सावरण्याचा प्रयत्न करत संघाला सत्तरी पार करून दिली. मात्र मिचेल स्टार्कने विराट कोहलीला १४ धावांवर बाद करत भारताला चौथा आणि मोठा झटका दिला.

दरम्यान हिल्या दिवसाखेर ऑस्ट्रेलियाने तीन बाद ३२७ धावांचा डोंगर उभारला होता. दुसऱ्या दिवशी भारतीय गोलंदाजांनी भेदक मारा करत ऑस्ट्रेलियाचा डाव गुंडाळला. मोहम्मज सिराजने सर्वाधिक चार विकेट घेतल्या. स्टिव स्मिथ याने शतकी खेळी केली. •➤ पान ५ वर

नवीन प्रकल्पाच्या विरोधात संताप

शहापूरच्या शेतकऱ्यांचा पुन्हा एल्गार

। अलिबाग । । विशेष प्रतिनिधी । शहापूर,ता.अलिबाग येथे होऊ घातलेल्या नवीन दोन प्रकल्पाच्या विरोधात प्रकल्पग्रस्त शेतकरी एकवटले आहेत. त्यांनी गुरुवारी जिल्हा प्रशासन आणि एमआयडीसीच्या विरोधात जोरदार निदर्शने करीत आपला संताप व्यक्त केला.

चौदा वर्षापूर्वी शहापूर परिसरात टाटा विद्युत प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या. मात्र आजतागायत तो प्रकल्प उभारला गेला नाही. असे असतानाही सरकारने याच जागेवर आता अन्य दोन प्रकल्प आणण्याचा घाट घातला आहे. या दोन प्रकल्पांसाठी मुख्य रस्ता सोडून नवीन रस्ता सुरु करण्याची योजना एमआयडीसीने आखली आहे. याबाबतचे वृत्त समजताच संतप्त झालेल्या प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी प्रकल्पासाठी रस्ता मोजणी करणाऱ्या कार्यालयास भेट देऊन पाहणी करीत आपला संताप व्यक्त केला. यावेळी शेकडो प्रकल्पग्रस्त जमून घोषणाबाजी करु लागले. ज्येष्ठ नागरिक अरविंद बाबू पाटील, विद्याधर पाटील यांनी यापूर्वीच्या प्रकल्पासाठी जमिनी संपादित केलेल्या आहेत.त्यासाठी रस्ताही तयार केला असताना नवा रस्ता कशासाठी अशी विचारणा केली.

उपलब्ध माहितीनुसार नव्या प्रकल्पासाठी २५ हेक्टर जमिनी संपादित केली जाणार आहे.यासाठी संबंधित शेतकऱ्यांना ३२-१ च्या नोटिसा पाठवून त्याची मोजणी करण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासनाने केला आहे.याचा शेतकऱ्यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला. सन २०१९ मध्ये शहापूर, पेझारी, कमळपाडा, धामणपाडा आदी गावातील सुमारे १५०० एकरातील शेतकऱ्यांनाही ३२- १ च्या नोटिसा पाठविण्यात आल्या होत्या. त्याबाबत शेतकऱ्यांनी हरकतीही नोंदविल्या होत्या. अगोदर प्रकल्पाच्या ठिकाणी जनसुनावणी घ्या, सुविधांचे पॅकेज जाहीर करा, मगच मोजणी करा, अशी मागणी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली असताना झोपी गेलेले एमआयडीसी अचानकपणे जागे होऊन त्यांनी •➤ पान ५ वर

अलिबाग किनारी स्वच्छता मोहीम

।अलिबाग विशेष। प्रतिनिधी।

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अलिबाग समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सामाजिक वनीकरण, रायगड -अलिबाग, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, प्रिझम, माणुसकी प्रतिष्ठान, स्वयंसिद्धा संस्था, आधार फाऊंडेशन, स्पर्धा विश्व अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने व विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात आली. युवक-युवतींनी, नागरिकांनी या मोहिमेत आपला सहभाग नोंदविला. वनक्षेत्रपाल प्रसाद गायकवाड, वनपाल सोनावणे, वनरक्षक उदय हटवार, निलेश शिंदे उपस्थित होते यावेळी प्रिझम संस्थेच्या वतीने पथनाट्यातून जनजागृती देखील करण्यात आली होती.

इमेज कॅलेंडरसाठी सहभागाचे आवाहन

। अलिबाग। प्रतिनिधी।

अलिबाग येथील छायाचित्रकारांच्या नजरेतून इमेज कॅलेंडर या दिनदर्शिकेची निर्मिती दरवर्षी करण्यात येत असते. यंदा इमेज कॅलेंडरच्या प्रकाशनाचे सहावे वर्ष आहे. याही वर्षी या कॅलेंडर साठी मोफत छायाचित्र स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील पहिली १२ छायाचित्रांना प्रसिद्धी दिली जाणार आहे. यावर्षी छायायाचित्रासाठी दोन विषय ठेवण्यात आले आहेत. यामध्ये रायगड जिल्ह्यातील निसर्ग सौंदर्य, कोकणातील पारंपरिक सण यांचा समावेश आहे. हे फोटो १५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत jshigwan9gmail.com पाठवावेत.अधिक माहितीसाठी जितू शिगवण - ९८९०९०५१५६, रमेश कांबळे - ९६३२९७३६६३, समीर मालोदे - ९४२३३७५३६१ येथे संपर्क साधावा.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ जून

१) श्री.नारायण केळकर
९-६-१९४७
अलिबाग
२)श्री.अनिल सिनकर
९-६-१९४७
मु.उमटे, अलिबाग
३) श्रीम. विजया मोहिते
९-६-१९६१
कोळीवाडा, अलिबाग
४)श्री.शरद पाटील
९-६-१९६१
चेंढरे, अलिबाग

चक्रीवादळाबाबत उरणचा मत्स्यविभाग अनभिज्ञ

प्रशासकीय सुचनांकडे दुर्लक्ष

। उरण। वार्ताहर।

अरबी समुद्रात निर्माण होत असलेल्या संभाव्य चक्रीवादळाबाबत उरणच्या मच्छिमारांना कोणतीही पूर्वसूचना देण्यात आलेली नाही. चक्रीवादळामुळ मासेमारीस समुद्रात जाण्यास बंदी आहे. मात्र उरणमधील मच्छीमार बांधवांना यासंदर्भात मत्स्यविभागाकडून कोणत्याही पूर्वसूचना दिल्या नसल्याचे मच्छिमारांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.याबाबत उरणमधील मत्स्यविभाग अधिकारी यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. वादळाच्या पार्श्वभूमीवर प्रादेशिक हवामान विभाग,मुंबई यांच्याकडून मिळालेल्या पूर्व सूचनेच्या अनुषंगाने अरबी समुद्रात ङ्गबिपर जॉयफनावाचे चक्रीवादळ तयार झालेले आहे. या वादळामुळे दि. ७ ते ९ जून या कालावधीत समुद्र खवळलेला राहणार आहे. मच्छिमारांनी मासेमारीसाठी समुद्रात जावू नये. तसेच जे मच्छिमार मासेमारीसाठी समुद्रात गेलेले असतील त्यांनी किनारी परत यावे. या कालावधीत समुद्र किनारी वेगाने वारे वाहणार असल्याने नागरिकांनी तसेच पर्यटकांनी समुद्र किनारी (बिचेसवर) जाणे टाळावे असा इशारा दिलेला आहे.

कुठल्याही प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये मदतीसाठी जिल्हा नियंत्रण कक्ष यांच्याशी संपर्क साधावा असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले असतानाही उरणमधील मच्छीमार बांधवांना किंवा जनतेला जागृत करण्यासाठी कोणतीही पूर्वसूचना दिलेली दिसत नाही. त्यामुळे समुद्रात वादळात एखादी दुर्घटना घडली तर जबाबदार कोणाला धरणार असा सवाल या निमित्ताने उभा रहात आहे. तरी मत्स्यविभाग प्रशासनाने याबाबत योग्य त्या पूर्वसूचना देणे आवश्यक आहे.

महावितरण — निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

अलिबाग विभागाअंतर्गत अलिबाग-२ उपविभागातील ग्राहकांचे रिडिंग घेणेसाठी, वीज देयके छपाई व वाटप करण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे:

निविदा क्रमांक	उपविभाग
बिलिंग/काअ/अलिबाग/टि-०५/०६/२०२३	अलिबाग-२

अंदाज पत्रकीय रक्कम :- प्रत्येकी १६८.१० लाख निविदा भरण्याची अंतिम दिनांक:- २३/०६/२०२३ अधिक माहितीसाठी पुढील संकेत स्थळावर संपर्क साधावा.
https://etender.mahadiscom.in/eatApp/

कार्यकारी अभियंता,
अलिबाग विभाग

PRO No.:- 1206 Dtd. 07/06/2023

HOME DEPARTMENT (PORTS & TRANSPORT)
MAHARASHTRA MARITIME BOARD
Indian Mercantile Chambers, 3rd Floor,
14 Ramjibhai Kamani Marg, Ballard Estate, Mumbai- 400 001
Tel : 022-22658375, Fax : 022-22614331
Website : https://mahammb.maharashtra.gov.in

गृह विभाग (बंदरे व परिवहन)
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड
इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, ३ रा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र.: ०२२-२२६५८३७५, फॅक्स क्र. : ०२२-२२६१४३३१
Email : ceommb@gmail.com

ई-निविदा सूचना (सन २०२३-२४)
Main Portal : http://mahatenders.gov.in

मुख्य कार्यकारी, अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व स्थापत्य अभियांत्रिक कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी बी-१ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.)	इसारा रक्कम (रु.)	कोऱ्या निविदेची किंमत (रु.)	काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिन्यात)
१.	मांडवा ता.अलिबाग जि.रायगड येथील जेट्टीजवळील मुख्य कमानीच्या जवळ संरक्षण भिंत बांधणे.	२,३८,६०,७९२/-	१,५०,०००/-	२,३६०/-	१२ महिने (पावसाळा कालावधी धरुन)

तपशीलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०९-०६-२०२३ रोजी १०.०० वा. पासून उपलब्ध होतील.
कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई

खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर दुरूस्त नोटीस

उपविभागीय अधिकारी महाड यांचे कार्यालय
ता.महाड जि.रायगड
दिनांक : १९/०४/२०२३

क्रमांक :- भूसंपादन/कात-५/विन्हेरे, फाळकेवाडी, ताम्हाणे/थेख./नोटीस/१/२०२३

राज्य मार्ग ९६ ते नागांव करंजाडी फाळकेवाडी तुळशीखिंड नातुनगर मार्ग रा.मा.१७५ चे विन्हेरे, फाळकेवाडी, ताम्हाणे या सार्वजनिक प्रयोजना करीता मौजे विन्हेरे, फाळकेवाडी व ताम्हणे, ता.महाड येथील जमिन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने संपादनाचे प्रस्तावीत आहे. नमुना १ ची जाहीर नोटीस यापुर्वी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यामध्ये अनुसूची १ चे मजकुरामध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यात आलेली आहे.

(हे.आर.) या मजकुरा ऐवजी (आर.पॉईज) असे वाचावे.

तसेच दिनांक १३/०२/२०२३ चे नमुना १चे जाहीर नोटीस संबंधी संयुक्त मोजणी पत्रकानुसार खालील क्षेत्र समाविष्ट करण्यात येत आहे.

मौजे फाळकेवाडी, ता.महाड जि.रायगड

अ.क्र	सर्व्हे नंबर	एकूण क्षेत्र (हे.आर.)	संपादित क्षेत्र (हे.आर.)
१	२	३	४
१	४७/१३	१.७०.००	०.२४.८०

ठिकाण : महाड
दिनांक : १९/०४/२०२३

सही/-
(प्रतिमा पुदलवाड-शेगुलवार)
उपविभागीय अधिकारी
महाड उपविभाग महाड

(क्र.जिमाका/राअ/जाहि/४३/२०२३-२४)

कर्जत नगरपरिषद, कर्जत जि.रायगड
जाहीर निविदा सूचना

जा.क्र./११९/२३-२४ दि.८/०६/२०२३

कर्जत नगरपरिषदेच्या मान्यतेने व वतीने खालील कामाकरीता निविदा मागविणेत येत आहे. तरी इच्छुक पुरवठादार/ठेकेदार यांनी कामाचे समोर नमूद केलेली निविदा फॉर्मची किंमत नगर परिषदेचे लेखा शाखेत रोख भरणा करून निविदा प्रति घेऊन जाण्याची व्यवस्था करावी. कोऱ्या निविदा फॉर्म दिनांक ०९/०६/२०२३ दिनांक १५/०६/२०२३ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत (सुटीचे दिवस वगळून) पुरविले जातील.

ठेकेदाराने आपले कडील शिलबंद निविदा दिनांक १६/०६/२०२३ रोजी ५.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद यांचे नांवे सादर कराव्यात. प्राप्त निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजता उपस्थित निविदाकारांसमोर उघडण्यात येतील. कोणतेही कारण न देता एक अगर सर्व निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

अ. क्र	कामाचा तपशील	कोऱ्या निविदा फॉर्म फी	इसारा रक्कम	कामाची मुदत
१	स्वच्छ भारत अभियान अंतर्गत उच्चत्तम प्राप्त केलेल्या आसाम राज्यातील रंगीया शहराचा अभ्यास दौरा आयोजित करणे (Explorer Visit)	२००/-	२०००/-	

सही/- (वैभव गारवे) मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद, कर्जत
सही/- (सौ.सुवर्णा केतन जोशी) अध्यक्ष कर्जत नगर परिषद, कर्जत

टिप : १. इसारा रक्कम रोखीने भरण्याची आहेत.
२. निविदा फॉर्म पोस्टाने पाठविले जाणार नाहीत.
३. मुदतीनंतर आलेल्या खाडाखोड करून सांक्षाकित न केलेल्या व अटीशर्तीयुक्त निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
४.निविदाकाराने आपले दर हे साहित्य नगरपरिषद कार्यालयांत पोहच देणे व सर्व करांचा अंतर्भाव करून भरणेचे आहेत.

प्रोसेस जमा रु .५०/- अर्जदार तर्फे अँड. प्रदिप गो. तांडेल

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे. मुख्य न्यायदंडाधिकारी साो., रायगड यांचे न्यायालयात

कि. चौ. अर्ज नं. १४०/२०२३

श्रीमती निरा पांडुरग पाटील
(विवाहुनंतरचे नाव निरा कृष्णा दवंडे)
वय ५८ वर्षे, धंदा-काही नाही
रा. परहूरपाडा,कामार्ले, अलिबाग अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड.
व सध्या रा.सोनल बिल्डींग समोर,गोमा फोटो स्टुडिओ,
शिवदर्शन सेवामंडळ,सांताळूझ(प), मुंबई-४०००५४
मोबाईल नं.८४२५८५३१०४

विरूध्द

जन्ममृत्यू विवाह नोंदणी अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत परहूर सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

अर्जदार हिचा जन्म दि. १५/०८/१९६४ रोजी मौजे परहूर, ता. अलिबाग जि.रायगड येथे झालेला असून तिची जन्म नोंद निबंधक, जन्म मृत्यू विवाह नोंदणीअधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत परहूर, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे जन्म मृत्यू नोंदजिस्टूला नोंद नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार श्रीमती निरा पांडूरंग पाटील हिचा जन्म दि. १५/०८/१९६४ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीलांमार्फत मा.न्यायालयात दि.१७/६/२०२३ रोजी समक्ष हजर राहून दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना त्यांची स्वत:ची जन्म मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ८/६/२०२३ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिध्द केली.

कनिष्ठ लिपीक — **सि.जि.एम.कोर्ट अलिबाग.**
अधिक्षक — **सि.जि.एम.कोर्ट अलिबाग**

अलिबाग नगरपरिषद, आरोग्य विभाग
ई-निविदा सुचना सन २०२३-२४

आरोग्य नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील ई-निविदा सुचनेमध्ये अलिबाग नगरपालिकेचे कुत्र्यांचे निबिंजीकरण शस्त्रक्रिया करून रेबीज लस टोचणे बाबत ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई निविदा सुचना शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०९/०६/२०२३ पासुन उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करणेंत येईल.

सही/-
मुख्याधिकारी,
अलिबाग, नगरपरिषद

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत सदर जमिन मिळकतीचे विद्यमान मालकांकडून रजिस्टर्ड खरेदीखताने विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

मिळकतीचे वर्णन : जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, पेण नगर परिषद हद्दीतील, मे.दुय्यम निबंधक पेण यांचे कार्य क्षेत्रातील तलाठी सजा-पेण, मौजे-पेण ग्रामीण हद्दीतील जमिन मिळकतीचे ७/१२ नुसार वर्णन खालील प्रमाणे:-

मौजे	सर्व्हे नं	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू.-पैसे
पेण ग्रामीण	३२७/२	०-४०-०	८-३७

पैकी ०-१६-० हे.आर.चौ.मी.ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरहू संपूर्ण जमिन ही सद्यस्थितीत ७/१२ सदरी १)श्री.समीर सुभाष म्हात्रे व २) श्री.अस्लम अब्दुल हमीद पानसरे यांचे सामाईक मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील असून ती त्यांचेकडून माझे अशिल खरेदीखताने कायमस्वरूपी विकत घेत आहेत. सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर इतर कोणाचा तारण, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, मृत्यूपत्रांकीत, दान, जप्ती, साठेकरार, वहिवाट, दावा, अपिल भाडेपट्टा, भाडेकरार, मालकी, बोजा, जाणे-येणेचा मार्ग अथवा कायदेशीर हक्क अगर हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या कायदेशीर कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून ७(सात) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत सदर जाहीर नोटीसीस कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची जमिन ही निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून त्यावर कोणाचेही कायदेशीर हक्क अगर हितसंबंध नाहीत व असल्यास ते त्यांनी जमिन मालकांच्या लाभांत जाणीव पुर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून माझे अशिल विद्यमान मालकांबरोबर खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सही/-
पेण-रायगड **ॲड.संजय भास्कर पाटील**
दि.०९/०६/२०२३ परमार प्लाझा शॉप नं.१६,
तळमजला, शिवाजी पथ,
पेण-रायगड ४०२१०७
मोबा. ९८८१९१५२१९

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे मार्केवाडी, ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुनिलकुमार रामस्वरूप सोनी, श्री.सुरेश शेषमल ओसवाल यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे मार्केवाडी, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
२३	२ अ ३	०-५५-३०	०-५०
२५	७	०-०२-००	०-२५
२६	५	०-३२-००	०-७०

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०९/०६/२०२३ खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मो.९९२१७२२२०० **समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं.५ अे, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, कर्जत, रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पोटल, ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक शरीफा रज्जाक मालकदार यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजे पोटल, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नं	हिस्सा नं	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)
३७	१/ब	०-४५-१० पैकी शरीफा रज्जाक मालदार यांचे अविभक्त हिश्श्याचे खरेदी करणेचे क्षेत्र ०-१८-००	५-८७

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७(सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०९/०६/२०२३ खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

दिनांक : ०९ जून २०२३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे आमचे अशिलांनी विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीचे संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकाचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमूद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे कामतपाडा, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे-आर-पॉ.	आकार रू-पै.
जयेश काळुराम सावंत	१५	१अ	२-१५-८०	४-७०
विजय मारूती वडेकर	यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-२०-० इतके मात्र			

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१

सही/-
ॲड.भुपेश तानाजी पेमारे
दिनांक -०९/०६/२०२३
मो.नं. ९१५८२७७७२८

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, पनवेल
पिनकोड-४१० २०६
E-mail-panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स- ०२२-२७४६७४४०
ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र.४३ (ई निविदा) सन २०२३-२४

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल ई (दुरध्वनी क्र.०२२-२७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण १ काम समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०९.०६.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक २३.०६.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग पनवेल, जि.रायगड
दिनांक :-

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

प्रोसेस जमा ५०/- अर्जदारातर्फे वकील
अॅड.महेश सुहास म्हात्रे

अलिबाग येथील मा.दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात, जिल्हा रायगड,

दिवाणी चौकशी अर्ज क्र.६५/२०२३
नि ७/ड

श्रीमती स्मिता सतिश पाटील
वैगरे ३ अर्जदार

विरूद्ध

कोणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील दिवंगत सतीश मोरेश्वर पाटील. यांचा मृत्यु दिनांक ०५/०४/२०२१ रोजी झाला असून अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारस आहेत.

दिवंगत सतीश मोरेश्वर पाटील, यांचे नावे असलेली मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील सर्व्हे २, हिस्सा नं.१ब, प्लॉट नं.२, क्षेत्र ७४२.१२५ चौ.मी., आकार १५.०९ रु.पै., या मिळकतीवरील नियोजित ''जय गजानन को ऑप हा सोसासटी लि.'' या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३०३, क्षेत्र-५७५ चौ.फुट बिल्टअप, ४११ चौ.फुट कारपेट चेंढरे ग्रामपंचायत मालमत्ता नं. १६४०/१६ ही मिळकत दिवंगत सतीश मोरेश्वर पाटील, यांचे पश्चात अर्जदार यांचे नावे होण्यासाठी अर्जदार यांनी ग्रामपंचायत चेंढरे यांचेकडे चौकशी केली असता सदर कार्यालयाने अर्जदारास मे. न्यायालयाकडून वारस दाखला आणण्याची तोंडी सूचना दिलेली आहे. हा अर्ज वारस दाखला मिळणेकरीता मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना दिवंगत सतीश मोरेश्वर पाटील यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून एक महिन्यांचे किंवा २१/०६/२०२३ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकीलामार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे दिवंगत सतीश मोरेश्वर पाटील यांचे कायदेशिर वारस म्हणून वारस दाखला देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येवून मे. न्यायालयात आवश्यक तो वारस दाखला देणेचा हुकूम अर्जदार यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०६/२०२३ रोजी माझे सहीनीशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

(लिपिक) — **दिवाणी. न्यायालय व.स्तर अलिबाग**
(अधिक्षक) — **दिवाणी न्यायालय व.स्तर अलिबाग**

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सायडोंगर, ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक उदय मुरलीधर कोळवणकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे सायडोंगर, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
३५	४/ब	०-१७-४०	०-०९
३५	५	०-०२-८०	०-०६

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ११(अकरा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०९/०६/२०२३ खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मो.९९२१७२२२०० **समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं.५ अे, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, कर्जत, रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे किरवली ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती प्लॉट मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचा विद्यमान मालक जया वेणुगोपाल नायर यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नंबर	प्लॉट नंबर	क्षेत्र चौ.मी	आकार रू.पै.
७३	२	३४८-३७	३४-८४

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७(सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०९/०६/२०२३ खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मो.९९२१७२२२०० **समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं.५ अे, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, कर्जत, रायगड



पीएनपीमधील विद्यार्थ्यांचा सन्मान

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पीएनपी एज्युकेशन सोसायटीमध्ये मराठी व इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या दहावी व बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन संस्थेत प्रथम येण्याचा बहुमान मिळविला. त्या पहिल्या तीन गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, अलिबागमधील प्रसिध्द गायिका मुग्धा वैशंपायन यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानपत्र, गुलाबपुष्प व माजी राष्ट्रपती एपीजे अब्दूल कलाम यांचे पुस्तक देऊन गौरव करण्यात आला.

नुकताच दहावी व बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेमध्ये पीएनपी एज्यूकेशन सोसायटीमधील इयत्ता दहावीतील मराठी माध्यममध्ये निकूल भावे (९२.२० टक्के) याने गुण मिळवून संस्थेत प्रथम क्रमांक मिळविला. श्रावणी गिजे (८९.६०) हिने गुण मिळवून व्दितीय व तेजल बोरकर (८७.२० टक्के) गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. इंग्रजी माध्यमातील दहावीची विद्यार्थीनी लक्ष्मी ठाकूर (९८.८० टक्के) गुण मिळविले. तसेच श्रेया पाटील (९२.२० टक्के) गुण मिळवून द्वितीय व आर्या पाटील (८७.६० टक्के) गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. बारावीच्या परीक्षेत श्रावणी राजेश खेडेकर (९१.१७ टक्के) गुण मिळवून प्रथम, आसावरी नरेश गावंड हिने (८२.३३ टक्के) गुण मिळवून व्दितीय व चैत्राली सुनील मराठे (८१.५० टक्के) गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

दहावी व बारावीच्या परीक्षेत इंग्रजी व मराठी माध्यमातून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळविलेल्या या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार पीएनपी शिक्षण संस्थेच्या सभागृहात गुरुवार (दि. ०८) रोजी करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये एम. ए. (व्होकल) शिक्षण पूर्ण करून सुवर्ण पदक पटकाविणाऱ्या व लिटील चॅम्प फेममधील अलिबागमधील प्रसिद्ध गायिका मुग्धा वैशंपायन यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी भगवान वैशंपायन, पीएनपी कॉलेजचे संचालक विक्रांत वार्डे, पीएनपी सर्व शाळांचे मुख्याध्यापक आणि इतर मान्यवर मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित देशपांडे यांनी केले.

अलिबागकरांचे प्रेम आशीर्वाद कायम राहू दे : मुग्धा वैशंपायन

दहावी व बारावीच्या परीक्षेत विशेष गुण संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्या निमित्त पीएनपी शिक्षण संस्थेत येण्याची संधी मिळाली. त्यामुळे खुप समाधान वाटत आहे. सारेगमप या स्पर्धेच्या माध्यमातून अलिबागकरांनी तसेच भाईंनी भरपुर प्रोत्साहन दिले. तसेच सत्कारही केला आहे. आता संगीत क्षेत्रात मास्टरची डीग्री संपादन करून एक वेगळ्या पध्दतीने या क्षेत्रात भरारी घेण्याची संधी मिळाली आहे. ज्याप्रमाणे सारेगमपतून तुम्ही सर्वांनी आशिर्वाद व प्रेम दिलेत तसेच प्रेम व आशिर्वाद पुढेच कायम राहू दे अस प्रतिपादन प्रसिध्द गायिका मुग्धा वैशंपायन यांनी केले. भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये एम. ए. (व्होकल) शिक्षण पुर्ण करून सुवर्ण पदक पटकाविल्याबद्दल विशेष सत्कार करताना मुग्धा वैशंपायन म्हणाल्या.

सर्वे येथे भात बियाणे वाटप

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुड तालुका कृषी विभाग व काशिद ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे येथील संकुलात शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात सुधारित भात बियाणे वाटप करण्यात आले.

यावेळी विलास मोरे, संतोष राणे, अमित खेडेकर, कृषी विभागाचे तालुका कृषी अधिकारी अहिरे, कृषी सहाय्यक आदिराज चौलकर, सुशील खोपकर, संतोष कासार, हरिश्चंद्र कांगणे, सुरेश महाडिक, दिनेश दिवेकर, नितेश धार्वे, शेतकरी बांधव उपस्थित होते.

मागील पाच वर्षांपासून येथील शेतकऱ्यांना ग्रामपंचायत मार्फत भात बियाणे वाटप करण्यात येत आहे. नम्रता कासार-खेडेकर यांनी ग्रामपंचायतीमध्ये राबविलेल्या विविध योजनांपैकी मोफत भात बियाणे वाटप उपक्रम असून त्याला शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळत आहे. कृषी सहायक आदिराज चौलकर यांनी उपस्थितांना भात बियाणे उगवण क्षमता चाचणी, भात बियाण्यास मिठाच्या द्रावणाची प्रक्रिया, बुरशीनाशकांची प्रक्रिया व जिवाणू संवर्धकांची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले.

अवैध पार्किंगमुळे नागरिक त्रस्त

। सुधागड -पाली । वार्ताहर ।

पाली शहरातील सर्वाधिक कळीचा मुद्दा कोणता असेल तर तो वाहतुकीचा व अवैध पार्किंगचा. शहर हे अष्टविनायकांपैकी एक क्षेत्र, असे असले तरीही या शहरात गणपतीचे देवस्थान व्यतिरिक्त पार्किंगची व्यवस्थाच नसल्याने ही बाब व्यवस्थेचे वाभाडे काढण्यासारखीच आहे.

हटाळेश्वर चौक, गांधी चौक येथील वाहतुकीचा प्रश्न नेहमीच वादग्रस्त राहिला आहे. या परिसरात होणाऱ्या अवैध पार्किंगमुळे रस्त्याने चालणारे पादचारी तसेच दुकांनदार हे त्रस्त झाले असून या अवैध पार्किंगमुळे दुकांनदारांमध्ये भांडणही होत असतात. रस्त्यावर अवैध दुचाकी वाहने पार्किंगमुळे शहरांमध्ये वाहतूक कोंडी होत असते. वाहतुक कोंडी व अवैध पार्किंगमुळे पालीकर हैराण झाले आहेत. गांधी चौक ते बाजारतळे (हटाळेश्वर चौक) या रस्त्यावर सर्वात वाहतुकीची कोंडी होते. या रस्त्यांवर असंख्य टू-व्हीलर्स उभ्या असल्याने नागरिकाना तर जीव मुठीत धरून मार्ग काढावा लागतो. या अवैध पार्किंग कारवाई होणार तरी कधी? हि जबाबदारी नक्की कोणाची ?

शांतता कमिटीची बैठक

। पनवेल । वार्ताहर ।

सध्या महाराष्ट्रात सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट व स्टेटस व्हायरल होत असल्याने हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झालेला असून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून गुरुवारी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या अध्यक्षतेखाली शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी विजय कादबाने यांनी उपस्थितांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.

सध्या महाराष्ट्रात सकल हिंदू समाजाचे भव्य मोर्चे आयोजित करण्यात आले आहेत. तसेच सोशल मीडियावर महपुरूषांच्या आक्षेपार्ह पोस्ट व स्टेटस समाजकंटकांकडून वायरल होत असल्याने हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झालेली आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत असलेल्या सर्व पोलीस ठाण्यात सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या अध्यक्षतेखाली आज शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी उपस्थितांना सतर्क राहण्याबाबत सूचना दिल्या तसेच काही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास तात्काळ पोलीस ठाणे येथे माहिती द्यावी या बाबत सूचना केल्या. यावेळी शांतता कमिटीचे सदस्य जयंत पगडे, महेश साळुंखे, मुकीद काझी, पराग बालड, जवाद काझी, इम्तियाझ बेग, नावेद पटेल, मोझेस कोरलेकर, इमाउद्दीन देशमुख, प्रसाद म्हात्रे यांच्यासह गोपनीय विभागाचे अधिकारी संजय धारेराव उपस्थित होते.

लोखंडी सळईने मारहाण

। पनवेल । प्रतिनिधी ।

लोखंडी सळईने मारहाण केल्याप्रकरणी दिनेश मधुकर पारधी (मोसारा) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वैभव अशोक पाटील (मानघर) याच्या शेतामध्ये दिनेश पारधी याने जेसीबी लावून साफसफाई केली व तो घरून निघून गेला असल्याचे समजले.

वैभव शेतात गेला असता तेथे साफसफाई केल्याचे दिसले. या यावेळी दिनेश तिथे आला व शेतात साफसफाई का केली असे विचारले असता ही जागा तुझी नाही फॉरेस्ट जागा आहे याबाबत राजू यांनी सांगितले असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी दिनेशला राग आला व त्याने हातातील लोखंडी सळई वैभवच्या डोक्यात मारली. ती वाचवण्याचा प्रयत्न केला असता डाव्या कपाळावर लागून टेंगूळ आले. त्यावेळी हेमंत ठाकूर व सुनील पारधी यांनी त्यांची भांडणे सोडवली.

कौलारू घरे नामशेष होण्याच्या मार्गावर

। पाताळगंगा । वार्ताहर ।

पावसाचे आगमन होण्याच्या आधी खेडेगावात वेध लागाता ते आपले घरावरती असलेले छपर व्यवस्थित करण्याची प्रत्येकाची धडपड सुरु असते. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कौलारू घरे असल्यामुळे ती कौल सारखी करण्यासाठी प्रत्येकाची लगबग असते. परंतू बदलत्या काळात कौलारू घरे नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याने प्रत्येक व्यक्ती घर बांधताना कौल न वापरता

सिमेंटच्या पत्राचा उपयोग करीत आहे.यामुळे मातीची कौल इतिहास जमा होत चालली आहे.

आजही शहरासह खेडेगावही बदलत चालले आहे. सिमेंटच्या जंगलांनी घरे व्यापली जात आहेत. खेड्यातील कौलारू घरासह इतरही अनेक बदल होताना पहावयास मिळत आहे. दरवर्षी पावसाळा सुरू होण्याआधीच कौलारू घरांची डागडूगी करणे गरजेचे असे यालाच घर फेरणे असे म्हणतात. आज घर फेरणारे कारागीरही दुर्मिळ झाले आहे. कौलारू घर उन्हाळ्यातही गरम होत नाही. आजही खेड्यात चार दोन घरे कौलारू दिसतात मात्र नवीन घर निर्मितीच कौलारू घरे बंद होत असल्याने हळू हळू अस्तित्वात असणारी कौलारू घरेही नामषेश होत चालली आहे.

दोन हजाराच्या नोटा घेण्यास नकार

। उरण । वार्ताहर ।

आरबीआयने दोन हजार रुपयांच्या नोटा बँकेत बदलून घेण्यास सांगितले आहे. नोट बदलण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंतचा अवधी देण्यात आला आहे. त्यानंतर नोट बदलता येणार नाही. त्यामुळे सर्वच व्यक्ती आपल्या जवळ असलेल्या नोटा खर्च करत आहेत. अशातच उरणमधील काही व्यापारी वर्गाने दोन हजार रुपयांच्या नोटा स्वीकारणं बंद केल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. यामुळे सर्वसामान्य जनतेची कोंडी होत असल्याने भीक नको पण कुत्रे आवर अशी गत झाली आहे.

व्यापारी वर्गाकडून सामान किंवा खाद्यपदार्थ खरेदी केल्यानंतर दोन रुपयांची नोट दिल्यावर घेण्यास नकार दिला जात आहे. दुसरीकडे शेठ पगारात दोन रुपयांच्या नोटा देत असल्याने या नोटांचे काय करायचे असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे. तरी चलनात ३० सप्टेंबर पर्यंत नोट घेण्याची सक्ती करावी अशी मागणी उरणच्या जनतेकडून केली जात आहे.

१ जूनपासून मासेमारी बंद असल्याने पनवेलच्या कोळी वाड्यातील कोळी बांधव नविन जाळ विणताना. (छाया : राजेश डांगळे)

पनवेल शहर पोलीस ठाण्यात निवेदन

। पनवेल । वार्ताहर ।

नांदेड येथील बोंडार हवेली येथील मागासवर्गीय समाजाचा युवक अक्षय भालेराव याच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या अशी मागणी स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक उद्धव सोळंके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड जिल्ह्यातील बोंडार हवेली येथीला युवक अक्षय भालेराव याचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आबेडकर यांची जयंती साजरी केली म्हणून सवर्ण समाजातील सात ते आठ गावगुंडांनी मिळून लाठ्या, लोखंडी रॉड व चाकूने निर्घुणपणे खून केला. यामुळे दलित समाजामध्ये भितीचे व दहशतीचे वातावरण पसरलेले आहे. दलितांवर अन्याय करण्याचे प्रमाण वाढत चाललेले आहे.

कायद्याचा व पोलीस प्रशासनाचा शाक गावगुडाना राहीलेला नही अश्या नरायम कृत्य करणात्या आरोपीना अटक करून फाशीची सजा देण्यात यावी व त्यासाठी उज्वल निकम सारखा सरकारी वकील नेमण्यात यावा अशी मागणी साळुंखे यांनी केली आहे.

तळोज्यात विजेचा लपंडाव

। पनवेल । वार्ताहर ।

तळोजा फेज एक वसाहतीमध्ये बुधवारी (ता. ७) रात्री विजेचा लपंडाव सुरू होता. पहाटे चार ते सकाळी अकरा वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित होत असल्याने उकाड्याने नागरिक हैराण झाले. वीज खंडित झाल्यामुळे अंधारातच राहण्याची वेळ रहिवाशांवर आली होती. अशातच अजूनही पावसाने हजेरी लावल नसल्याने वातावरणातील उष्मा वाढलेला आहे. त्यामुळे

एकीकडे असह्य असा उकाडा जाणवत असताना दुसरीकडे रात्रभर पंखे, कूलर, एसी बंद असल्याने रात्रभर जागरणाची वेळ रहिवाशांवर आली होती.

वीज नसल्यामुळे अनेक सोसायट्यांमधील लिफ्ट बंद पडल्याने शिडीवरून चढ उतार करण्याची वेळ नागरिकांवर आली; तर अनेक ठिकाणी पाणी पुरवठ्याची यंत्रणाच कोलमडली होती. याविषयी महावितरणच्या कार्यालयात विचारणा केली असता सेक्टर दहामध्ये विद्युत वाहिन्यात बिघाड झाल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला असल्याचे कारण देण्यात आले.

महानगरपालिका नगर पथविक्रेता समितीचा निकाल जाहीर

। पनवेल । वार्ताहर ।

दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत मफेरीवाल्यांना सहाय्यफ या घटकांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या नगर पथविक्रेता समितीच्या सन २०२३-२४ साठी निवडणुकीचा निकाल गुरुवार आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात जाहीर करण्यात आला.

या निवडणुकीमध्ये इतर मागास प्रवर्गामध्ये प्रतिक्षा अनिल माळी, विकलांग महिला राखीव प्रवर्गामध्ये अंजू राजू कोळी, सर्वसाधारण प्रवर्गामध्ये अनिकेत पांडुरंग थोरात, मंगेश पंढरीनाथ गोवारी,सर्वसाधारण महिला राखीव प्रवर्गामध्ये आशा राजू मोरे, विजयी झाले.

अनुसूचित जाती प्रवर्गातून भिकाजी सुखदेव लोंढरे बिनविरोध निवडून आले.

एकुण आठ नगर पथविक्रेता सदस्यांसाठीची २०२३ ते २०२८ करिताची पंचवार्षिक निवडणुक दि. ७ जून रोजी संबधित चारही प्रभागामध्ये घेण्यात आली होती.

या निवडणुकीसाठी तेरा उमेदवारांनी निवडणुक लढवली. या निवडणुकीसाठी एकुण तीन हजार ७६ मतदार होते. यावेळी ५९.३० टक्के मतदान झाले. या निवडणुकीसाठी चार प्रभाग समिती अंतर्गत चार मतदान केंद्रावरती हे मतदान घेण्यात आले होते. एकुण आठ सदस्यांपैकी एका अनुसूचित जाती पदासाठी एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असल्याने या प्रवर्गातील जागा बिनविरोध निवडून आली. तसेच अनूसुचित जमाती व अल्पसंख्यांक प्रवर्गासाठी एकही नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले नाही. त्यामुळे एकुण पाच प्रवर्गासाठी एकुण १३ उमेदवारांनी निवडणुक लढविली.

निवडून आलेल्या सर्व उमेदवारांना निवडणुक निर्णय अधिकारी शितल कुलकर्णी आणि नोडल अधिकारी उपायुक्त कैलास गावडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आयुक्त गणेश देशमुख यांनी सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या, तसेच सर्व उमेदवारांचे आभार मानले.

या निवडणुकीसाठी दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान विभागाचे विभाग प्रमुख हरेश जाधव, तांत्रिक अधिकारी विनया म्हात्रे, नवनाथ पवार, विभागातील सर्व कर्मचारी तसेच चारही प्रभागाचे प्रभाग अधिकारी यांनी अथक परिश्रम घेतले.

चिरनेरमध्ये नालेसफाईला सुरुवात

। चिरनेर । वार्ताहर ।

पावसाळा अगदी तोंडावर आल्यामुळे चिरनेर गावातील नाले सफाईची कामे युद्ध पातळीवर सुरू करण्यात आली आहेत. चिरनेर ग्रामपंचायतीच्या मार्फत आणि गावात नुकत्याच निवडण्यात आलेल्या आपत्ती व्यवस्थापन समितीच्या देखरेखेखाली गावातील मुख्य आणि अंतर्गत नाल्यांमध्ये अडकलेला गाळ काढून नाल्यांची सफाई करण्याची कामे सुरू आहेत.

दरम्यान पूर परिस्थितीचा संभाव्य धोका टळावा, यासाठी या नाल्यांची सफाई करण्यात येत असल्याचे आपत्ती व्यवस्थापन समितीच्या वतीने सांगण्यात आले.

यावेळी राजिपचे सदस्य बाजीराव परदेशी, चिरनेरचे पोलीसपाटील संजय पाटील, शेकापचे चिटणीस सुरेश पाटील, चिरनेर गाव तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी, सामाजिक कार्यकर्ते सचिन घबाडी, ग्रामविकास अधिकारी महेश पवार ,विजय म्हात्रे, मंगेश पाटील, अमर परदेशी, संताजी ठाकूर तसेच अन्यजण उपस्थित होते.

सारिका, माफ कर..

वाईट असे आहे की, माफ कर असे कितीही म्हटले तरी ते ऐकायला सारिका आता या जगात नाही. सारिका म्हणजे सारिका रामदास पिरकर. कर्जत तालुक्यातील पळसदरी ठाकूरवाडी इथली ही तेरा वर्षांची मुलगी. हंडाभर पाणी आणण्यासाठी गेली होती. ते घेऊन येत असताना खोपोली-शहापूर महामार्गावर एका मोटारीने धडक दिल्याने गंभीर जखमी झाली. नंतर तिचा रुग्णालयात मृत्यू झाला. पळसदरी गावाच्या बाजूला डोंगरावर ठाकूरवाडी, कातकरवाडी असे आदिवासींचे पाडे आहेत. सारिकाच्या वाडीत पाण्याची भयंकर टंचाई आहे. पिण्याच्या पाण्यासाठी लांब दोन किलोमीटर अंतरावरील रेल्वेच्या पळसदरी धरणावर जावे लागते. आणि, उन्हातान्हातून लांबवरून पाणी आणण्याचे काम महिला आणि छोट्या मुलींनाच करायचे असते हा आपल्याकडचा नियम आहेच. सारिका तेच करीत होती. पाण्यासाठी येण्याजाण्याची वाट महामार्गामधून जाते. या महामार्गावरून भरधाव वेगाने जाणाऱ्यांचा भारत वेगळा आहे. त्यांना पैसे टाकले की हवे तितके बाटलीबंद पाणी विकत मिळते. त्यांच्यासाठी डोक्यावरून पाणी घेऊन इकडून तिकडे जाणाऱ्या मुली किंवा बायका म्हणजे निव्वळ कारच्या वेगातला अडथळा. अशाच एका कारवाल्याने सारिकाला उडवले. तो थांबेल किंवा मागे वळून पाहील ही शक्यताच नव्हती. त्याला अर्थातच त्याच्या जगात आणखी पुढे पोचण्याची घाई असणार. आपली कार धुण्यासाठी तो रोजचे पंचवीस हंडे पाणी खर्चत असणार. सारिकाचे वाडीवाले बिसलेरी का विकत घेत नाहीत असा प्रश्न त्या कारवाल्याला पडला असेल. हे वाडीवाले असल्या भरधाव वेगवाल्यांपासून दोन हात दूर राहतात. पण सारिका गाडीच्या मार्गात आडवी आली. तिची चूक झाली. काही लोक विचारतायत की पंतप्रधानांच्या हर घर जल योजनेचे काय झाले? पण या योजनेची मोठ्या गावांना व शहरांनाच अधिक गरज आहे, हे लक्षात घ्यायला हवे. आदिवासी लोक काय कुठूनही डोंगरदऱ्यातून पाणी आणू शकतात. त्यांना उन्हातान्हातून लांबच लांब चालण्याची सवय असते. शहरातले लोक काय करणार? अर्थातच त्यांची सोय आधी पाहायला हवी. आणि खरं सांगायचं तर या आदिवासींना जंगलांमधून बाहेरच काढायला हवे आहे. नाहीतरी, शेतांमध्ये, वीटभट्ट्यांवर किंवा बांधकामांवर मजुरांची गरज असतेच. ते अगदीच तयार नसतील तर दुसरा एक मार्ग आहे. यांच्या आदिवासीवाडया ताब्यात घेऊन तिथे शहरी लोकांच्या सेकंड होमच्या वसाहती करायच्या. बड्या बिल्डरांनी डोंगरांवर अशी घरे आणि बंगले बांधले की सरकार त्यांच्यासाठी एकदम शिस्तीत पाण्याची लाईन टाकते. आदिवासी लोक तिथेच कुठेतरी कोपऱ्यात राहिले तर त्यांनाही मग दोन-पाच हंडे पाणी मिळून जाईल. त्यांना नाहीतरी तेवढेच पुरते. आपला देश विकासाच्या महामार्गावरून त्या कारवाल्यासारखाच वेगाने धावतोय. त्यामुळे आज ना उद्या हे होणारच होते. हे ऐकून सारिकालाही आनंदच झाला असता. पण ती तर गेली. सारिका आम्हाला माफ कर- तुला ही विकासाची गोष्ट ऐकवायची राहून गेली.

विकृतीचे लाव्हा

मुंबईच्या मीरा रोड उपनगरातील मनोज साने नावाच्या इसमाने केलेले हे कृत्य अंगावर काटा आणणारे आहे. त्याने आपली सहचरिणी सरस्वती वैद्य हिला ठार मारून तिच्या शरिराचे तुकडे शिजवून व मिक्सरमधून काढल्याचे उघड झाले आहे. खुनाचा पुरावा नष्ट करण्यासाठी त्याने हे केल्याचे दिसते. पण ज्या व्यक्तीसोबत आपण जीवन व्यतीत केले तिचा इतक्या थंड रक्ताने खून करणे आणि एखादी भाजी चिरावी तितक्या सहजपणे तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करणे हे अत्यंत अतर्क्य आणि भयावह आहे. माणसांची संवेदना नष्ट होऊन ती कोणत्या टोकाला जाऊ शकतात याचे हे उदाहरण आहे. श्रध्दा वालकरचा खुनी आफताबनेही नेमके हेच केले होते. त्यावरूनच आपल्याला ही कल्पना सुचली असे मनोजने पोलिसांना सांगितल्याचे काही बातम्यांमध्ये म्हटले आहे. त्यावेळी हिंदुत्ववादी संघटनांनी मुस्लिमांविरुद्ध वातावरण पेटवण्यासाठी आफताबचा उपयोग करून घेतला होता. आता तरी व्हावी. अशा घटनांना पाशवी असे विशेषण लावले जाते. पण हिंस्त्र पशू केवळ खाण्यासाठी आपल्या भक्ष्याला मारतात. राग आला म्हणून आपल्या शत्रूचे ते असे तुकडे तुकडे करीत नाहीत. त्यामुळे हे सर्व वर्तन पशुच्याही पलिकडच्या कोटीतले म्हणावे लागेल. आफताब किंवा मनोज यांच्यासारख्यांमध्ये इतके क्रौर्य कुठून येते आणि अशी कृत्ये करून ते अतिशय थंड कसे राहू शकतात हा मानसशास्त्राच्या अभ्यासाचा विषय आहे. याची कारणे आपल्या व्यवस्थेत शोधावी लागतील. पूर्वीच्या काळी मुंबईसारख्या बड्या शहरात गेलेल्या चाकरमान्यांचे वर्षावर्षात दर्शन नसे. कधीमधी पत्र येई. कोणाकडून खबर मिळे. सानेगुरुजींच्या शामची आईमध्ये शामच्या मोठ्या भावाविषयी बोलताना वडिल सहजपणे म्हणतात की, तो नोकरीला गेलाय आणि प्लेगचे दिवस आहेत. आता तो पुन्हा नजरेला पडेल की नाही कोण जाणे. पण इतके अंतर आणि अनिश्चितता असूनही माणसे एकमेकांना अधिक जोडलेली होती. आज मोबाईलमुळे भौगोलिक अंतर संपून गेले आहे. पण माणसांमधील प्रेम, नात्यांमधील जिव्हाळा, आस्था झपाट्याने कमी होत चालला आहे. व्हिडिओ रील्समधून जगातल्या तमाम चांगल्या भावनांची रोज खिल्ली उडवली जात असते. दुसरीकडे मोबाईल गेम्समुळे एखाद्या झाडाची काटकी तोडणे आणि माणसाला मारणे यातला फरक संपून गेला आहे. वास्तवाचे दर्शन या नावाखाली सिनेमादी माध्यमांतून हिंसेचे जे चित्रण केले जाते ते संवेदना नष्ट करीत चालले आहे. आयुष्याला आलेला वेग आणि गळेकापू स्पर्धा यामुळे प्रत्येक माणूस दुसऱ्याकडे आपल्या वाटेतला शत्रू म्हणूनच पाहू लागला आहे. याचा परिणाम कुटुंबातील नात्यांवरही झाला आहे. एरवी आपल्याला जगात सर्व काही फार छान चालले आहे असे आपल्याला वाटत असते. पण जमिनीखालच्या ज्वालामुखींप्रमाणे अनेकांमधील भयानक विकृतीचा लाव्हा उफाळून निघण्यासाठी वाट पाहत असतो. मनोजचे उदाहरण त्याची आठवण करून देते.

विचार

ही तर दखलपात्र अधोन्नती

आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्यांसंबंधी जाहीर होणाऱ्या एका अमेरिकन अहवालामध्ये भारतातील धार्मिक स्वातंत्र्याच्या घसरत्या स्तराबद्दल चिंता व्यक्त होणे, याविषयी आपल्याकडे बोट दाखवले जाणे ही गंभीर बाब आहे. त्याचबरोबर शालेय पुस्तकांमधून लोकचळवळींवर आधारित प्रकरणे काढून टाकण्याची बाबही निंदनीयच म्हणावी लागेल. राज्यकर्ते या मार्गाने इतिहास लपवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण हा प्रकार कधीच यशस्वी होणार नाही.

असिम सरोदे

रशिया, भारत, चीन आणि सौदी अरेबियासह अनेक देशांची सरकारे उघडपणे धार्मिक समुदायाच्या सदस्यांना लक्ष्य करत असल्याचे यूएस स्टेट डिपार्टमेंटच्या २०२२ च्या अहवालात सांगण्यात आले आहे. या मनोगतामुळे एका चर्चेला तोंड फुटले असून खरोखर धार्मिक स्वातंत्र्याबाबत भारताचा क्रमांक घसरत आहे का, असा प्रश्न विचारला जात आहे. मात्र या वादाच्या पार्श्वभूमीवर मुळात आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्यावरील वार्षिक अहवालात काय म्हटले आहे याची गांभीर्याने माहिती घेणे गरजेचे आहे. यूएस स्टेट डिपार्टमेंट आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्यावर वार्षिक अहवाल जारी करते. यातून संपुर्ण जगातल्या देशांमधील धार्मिक स्वातंत्र्याच्या स्थितीचे दस्तऐवजीकरण होते. अमेरिकेचे परराष्ट्र सचिव अँटनी ब्लिंकन यांनी अहवाल प्रसिद्ध केल्यानंतर आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य कार्यालयाचे विशेष दूत रशद हुसैन यांनी वॉशिंग्टन येथे पत्रकार परिषदेत सांगितले की अनेक सरकारे उघडपणे त्यांच्या सीमांमधील धार्मिक समुदायांच्या सदस्यांना लक्ष्य करतात. या अहवालात जगभरातील सुमारे २०० देश आणि प्रदेशांमधील धार्मिक स्वातंत्र्याच्या स्थितीचे तथ्य-आधारित, सर्वसमावेशक दृश्य मांडल्याचा दावा केला गेला आहे.

धर्म उपासनेचे स्वातंत्र्य दडपणाऱ्या देशांना अधोरेखीत करणे आणि धर्म किंवा श्रद्धेचे स्वातंत्र्य संरक्षित असणाऱ्या जगाची प्रगती साधणे हे उद्दिष्ट असल्याचे ब्लिंकेन यांचे म्हणणे आहे. याच संदर्भाने विशेष दूत रशाद हुसेन यांनी भारताचा उल्लेख केला आहे. चीन आणि अफगाणिस्तानसह रशियानंतर काही देशांचा संदर्भ देत हुसैन म्हणाले की, भारतातील विविध धार्मिक समुदायांशी संबंधित कायदे असले तरी वकिलांनी आणि धार्मिक नेत्यांनी त्यांचे योग्य पालन न करण्याचे अनेक प्रकार, घटना समोर आल्या आहेत. देशातील मुस्लिमांविरुद्ध निंदनीय, द्वेषपूर्ण भाषणाच्या प्रकरणांचा निषेध होत असला तरी याकडे दुर्लक्ष करुन अशी कृत्ये आजही घडत आहेत. त्यामुळेच बहुलवाद आणि सहिष्णुतेची ऐतिहासिक परंपरा टिकवून ठेवण्याचा सल्ला त्यांनी दिला आहे. बर्मा (म्यानमार) लष्करी प्रशासन रोहिंग्या लोकसंख्येवर दडपशाही करत असल्यामुळे अनेकांना घरे सोडावी लागत असल्याचे स्मरणही त्यांनी केले. धार्मिक अल्पसंख्याकांच्या सदस्यांविरुद्ध कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी एका उत्सवादरम्यान गुजरातमध्ये साध्या वेशातील पोलिसांसह हिंसाचार केल्याच्या बातम्या आल्याचा संदर्भ त्यांनी इथे दिला आहे. त्यावेळी चार मुस्लिम आरोपींना सार्वजनिक मारहाण केली गेली. त्याचबरोबर एप्रिलमध्ये खरगोनमध्ये झालेल्या जातीय हिंसाचारानंतर हिंदू उपासकांना जखमी करणे आणि मध्य प्रदेश सरकारने मुस्लिमांची घरे आणि दुकाने उधळणे अशा अनेक घटना अलिकडच्या काळात समोर आल्याचे अहवालात म्हटले आहे.

या अहवालामध्ये म्हटले आहे की, मुस्लिम आणि हिंदूंमध्ये जातीय सलोखा कसा वाढवता येईल यावर चर्चा आणि भरसक प्रयत्न होणे ही काळाची गरज आहे. एक मानवतावादी कार्यकर्ता म्हणून म लाही असे वाटते. इतर धर्मियांना कमी मानण्यापेक्षा जगाची खबरबात घेणाऱ्या अहवालांमधून पुढे येणारे तथ्य समजून घेतले पाहिजे आणि सातासमुद्रापार आपल्या देशाची काय प्रतिमा उमटत आहे, हे तपासणे महत्वाचे आहे. असे प्रयत्न वारंवार होणे गरजेचे असून देशातील जातीय सलोखा टिकवून ठेवणे गरजेचे आहे, हे कोणीही नाकारणार नाही. ही दक्षता बाळगली तरच भारतासारख्या बहुधर्मीयांचे वास्तव्य असणाऱ्या देशात जातीय, धार्मिक सलोखा टिकून राहील आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर जाहीर होणाऱ्या अशा अहवालांमध्ये भारताकडे बोट दाखवण्याची संधी कोणाला मिळणार नाही.

याच अनुषंगाने शालेय पुस्तकांमधून लोकचळवळींचा इतिहास कमी करण्याचा विषयही सध्या चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. या दोन्ही मुद्द्यांचा तपशिलात जाऊन अभ्यास करण्याची गरज आहे. ते पाहता असे आवर्जून म्हणावेसे वाटते की, सध्या लोकचळवळींना काहीही महत्त्व राहिलेले नाही. आम्ही पुण्यात इरोम शर्मिला यांची मुलाखत घेतली होती. सर्वात जास्त सत्याग्रह आणि उपोषण करणाऱ्या शर्मिला यांची दखल अवघ्या जगाने घेतली आहे. संवाद साधताना आम्ही शर्मिला यांना विचारले, सध्याच्या सरकारने अनेक चुका केल्या आहेत, तुम्ही त्याबद्दल अनेक वेळा बोलला आहात. मात्र अजूनही स्त्रियांवर अत्याचार होत आहेत. असे असताना तुम्ही त्याविरुद्ध सत्याग्रह, आंदोलन करणार आहात का? तेव्हा त्या ठाम नकार देत म्हणाल्या की यापुढे कोणताही सत्याग्रह वा आंदोलन करणार नाही. याचे कारण देताना त्या म्हणाल्या 'कोणताही सत्याग्रह वा उपोषण करताना ते ज्यांच्याविरुद्ध करायचे आहे, ज्यांच्याकडून त्या मागण्या मान्य करुन घ्यायच्या आहेत त्या व्यक्तीदेखील संवेदनशील असण्याची गरज आहे. आणि आता तशी परिस्थिती नाही.'

ही साधारणत: चार ते पाच वर्षांपूर्वीची घटना आहे. त्यांच्या या वक्तव्याचा अर्थ समजून घेतला तर सध्याची चर्चेतली बाब अधिक नेमकेपणाने स्पष्ट होईल. मुळात लोकचळवळी यशस्वी होण्यासाठी लोकांचे प्रश्न समजून घेणारे सरकार आणि प्रशासन समोर असण्याची गरज असते. लोकांचा आवाज दडपून टाकायचा, लोकचळवळ करणाऱ्यांचेच गुन्हेगारीकरण करायचे, पुन्हा त्यांचा आवाज निघणार नाही अशी व्यवस्था करायची, त्यासाठी लष्कर वा पोलिसांचा वापर करुन घ्यायचा आणि पुढे न्यायव्यवस्थेचा गैरवापर करुन त्यांना दोषी ठरवायचे ही प्रक्रिया सध्याच्या राजकीय पार्श्वभूमीवर सातत्याने सुरू आहे. याच अनुषंगाने भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये वा लोकचळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेतला, सामाजिक परिवर्तनासाठी ज्यांनी पुढे पाऊल टाकले होते, त्यांचे नाव हटवण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. परिवर्तन हे नेहमीच पुरोगामी म्हणजेच पुढे नेणारे असते. पण अशा चळवळींमध्ये कधीही सहभाग नसलेल्यांना इतरांनी केलेल्या लोकचळवळींची माहितीदेखील व्हायला नको असे वाटणे स्वाभाविक आहे.

लोकचळवळीबद्दलची माहिती वाचून प्रेरणा मिळाली आणि अशांनी आपल्याविरुद्ध आंदोलन करावे हे आजच्या राजकारण्यांना रुचणारे नाही. त्यामुळे चळवळ उभी करण्याचा विचार मनात येईल अशा प्रकारचे काहीच कोणाच्या वाचनात न आणण्यासाठी लोकचळवळीचा इतिहास दुर्लक्षिण्याचा प्रयत्न पाठ्यपुस्तकातून मजकूर काढताना पहायला मिळत आहे. आपण सरकारमध्ये आहोत म्हणजे पुढची अनेक वर्षे इथे राहणार असल्याचा सत्ताधाऱ्यांचा गैरसमज झाला आहे. त्यामुळेच एनसीईआरटीच्या पुस्तकांमधून लोकचळवळींसंदर्भातील माहितीच काढून टाकायचा प्रयत्न केला गेला आहे. याद्वारे परिवर्तन करण्याची ऊर्जा असणारे, बदल घडवून आणला पाहिजे, नवीन काही गोष्टी अस्तित्वात आणल्या पाहिजेत अशी प्रवृत्ती असणारे समोर येऊ नयेत यासाठी केलेली ही व्यवस्था आहे, असेच म्हणावे लागेल. याच हेतूने अशी सगळे प्रकरणे पुस्तकांमधून काढून टाकली जात आहेत. पूर्वी लोकचळवळी उभारणाऱ्यांना सध्याचे सरकार मानत नाही. ते यांचे नेते नव्हते. त्यांचे विचार यांच्या विचारांपासून विभिन्न होते. असे असताना अशांची माहिती देऊन आपण स्वत:ला लहान का करायचे? असाही एक विचार यामागे असू शकतो. सध्याच्या लोकांनी स्वत:चे काही काल्पनिक नेते तयार केले आहेत. त्यांचीच महती पुढे आणण्याचे काम त्यांच्याकडून होत आहे. हा हेतू प्रबळ करण्याच्या हेतूनेही आधीची प्रकरणे पुस्तकांमधून काढली जात आहेत. मात्र असे कितीही प्रयत्न केले वा प्रकरणे काढून टाकली तरी इतिहास पुसला जात नसतो उलट तो अधिक ठळकपणे, गडदपणे समोर येत असतो.

या पार्श्वभूमीवर आता पाठ्यपुस्तकातून काढलेले धडे अभ्यासक्रमामध्ये पुन्हा समाविष्ट होऊ शकतात. कोणतीही सत्ता अमरत्व घेऊन आलेली नसते. त्यामुळेच कोणीही चुकीचा भ्रम ठेवू नये. खरे सांगायचे तर विद्यार्थ्यांना खरा इतिहास सांगण्यासाठी हिंमत असावी लागते. कोणी इतिहासातून प्रेरणा घेत असेल तर लोकशाहीने त्या प्रेरणांचा आदर केला पाहिजे. तरच ती सजग लोकशाही आणि समज असणारे राजकारण म्हणता येईल.

आजकाल

राज्याच्या प्रगतीचे खरे मानकरी

हेमंत देसाई

विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र नंबर वनवर आले आहे असे सांगताना, देवेंद्रजी म्हणाले की, खंडणी, वसुली आणि भ्रष्टाचार असा महाविकास आघाडीचा काळ संपून राज्यात नवे सरकार आले आहे. आता महाराष्ट्रात गुंतवणुकीचा वाढेल, हे आम्ही सातत्याने सांगत होतो वगैरे वगैरे... सत्तेत कोणाचेही सरकार असले, तरी महाराष्ट्रात गुंतवणूक वाढत असेल, तर ते अभिनंदनीयच आहे. त्याबद्दल विद्यमान सरकारचेही मी कौतुक करेन. परंतु त्याबद्दल बोलताना अगोदरच्या सरकारवर आरोप करून आपल्याला हवे ते राजकीय नॅरेटिव्ह निर्माण करण्यात देवेंद्रजींचा हात कोणीही धरू शकणार नाही! परंतु ही शुद्ध लबाडी आहे, हे स्पष्टपणे सांगावे लागेल! महाविकासच्या काळात लाखो कोटी रुपयांचे करार झाले, तेव्हा ते प्रत्यक्षात येणार आहेत कां?' ('का' वर अनुस्वार आहे हे लक्षात घ्या बरें...)असा कुजकट सवाल भाजपवाल्यांकडून केला जात होता. तेव्हा महाविकासमध्ये मंत्री होऊन सर्व फायदे मिळवणारे, सत्ता भोगणारे एकनाथ शिंदे आणि उदय सामंत हे, ठाकरे सरकार मोठमोठी गुंतवणूक कशी आकर्षित करत आहेत हे सांगत होते... आता मात्र ते महाविकासने राज्याचे वाटोळे केले आणि आमच्या सरकारने अवतार घेतल्याबरोबर महाराष्ट्राची कीर्ती सातासमुद्रापार कशी पोहोचली, हे सांगू लागले आहेत... या एकांगी आणि चलाखीच्या युक्तिवादाची पोलखोल केली पाहिजे. शिंदे-फडणवीस सरकार असताना अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेले, हे नाकारता येणार नाही. परंतु ऑक्टोबर २०१९ ते मार्च २०१३ या काळात महाराष्ट्रात चार लाख सात हजार कोटींची एकत्रित विदेशी गुंतवणूक झाली. गेल्या साडेतीन वर्षांत राज्यात झालेली ही गुंतवणूक म्हणजे, देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी २९ टक्के आहे. ऑक्टोबर २०१९ मध्ये फडणवीस सरकार होते, त्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे मंत्री देखील होते. २०१९ ते जून २०२३ दरम्यान ठाकरे सरकार होते आणि त्यानंतरचे ११महिने शिंदे सरकार आहे. याचा अर्थ ही गुंतवणूक मुख्यतः ठाकरे सरकार अस्तित्वात असताना आलेली आहे. त्यामुळे 'ठाकरे सरकारने महाराष्ट्राचा नायनाट केला' (केवळ वादासाठी हे गृहीत धरले, तरी त्या सरकारात शिंदे-फडणवीस सरकारमधील अनेक नेते होते. तेव्हा तेही या तथाकथित पापात सहभागी होते, असे म्हणावे लागेल) या बोलण्यात काहीही अर्थ नाही. देशाच्या जीडीपी वाढीपेक्षा जास्त वाढीचा दर ठाकरे सरकारच्या काळात महाराष्ट्राने पाहिला. दोन नोव्हेंबर २०२० ला मॅग्नेटिक महाराष्ट्रच्या दुसर्या टप्प्याअंतर्गत ३५ हजार कोटी रुपयांचे करार करण्यात आले. त्यापैकी ६० टक्के उद्योगांच्या बाबतीत जमीन अधिग्रहण वेगाने पारही पाडले गेले होते. २०१९ ते २०२० या वर्षभरात एकूण दोन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्यात आली. जिंदाल ग्रुपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल हे तसेच अनेक कंपन्यांचे प्रमुख आणि उद्योगपती हे करार करताना हजर होते. गुंतवणूक वाढवण्यासाठी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी प्रत्येक उद्योगासाठी रिलेशन मॅनेजरची नियुक्ती केली होती. एक्साइड इंडस्ट्रीज, भारत बॅटरी मॅन्युफॅक्चरिंग, श्रीधर कॉटसाइन, जे एस डब्ल्यू स्टील, गोयल गंगा व जी जी मेट्रोपोलिसचे आयटी पार्क, ग्रेविस भारतचा अन्नप्रक्रिया उद्योग, सेंचुरी फार्मास्युटिकल, इंडियन कॉर्पोरेशनचे लॉजिस्टिक पार्क, बजाज ऑटोचा कंपोनंट कारखाना, कीर्तिकुमार स्टीलचा पोलाद कारखाना, क्लीन सायन्स अँड टेक्नॉलॉजीचा रासायनिक कारखाना, सोनाईची खाद्यतेल रिफायनरी, सुनील प्लास्टिक इंडियाचा एनर्जी प्रकल्प असे वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रकल्प आकर्षित झाले होते. एकाच क्षेत्रातील नव्हे. त्यामधून अडीच लाख लोकांना रोजगार उपलब्ध मिळेल, असा अंदाज होता. शिवाय हे सर्व करोना काळात अत्यंत प्रतिकूल वातावरण असताना घडले होते. फडणवीस मुख्यमंत्री होण्यापूर्वी देखील महाराष्ट्र अस्तित्वात होता आणि त्याची स्थापनाही झाली होती..! इतक्या वर्षांत ज्या पायाभूत सुविधा निर्माण झाल्या, त्याचाही लाभ महाराष्ट्राला मिळत आहे फडणवीस यांनीही काम केले, पण इतरांनी काम केलेच नाही आणि म्हणून शेवटी आपल्याला जन्म घ्यावा लागला, असे कोणीही सांगू नये! २०२१- २२ मध्ये विदेशी गुंतवणुकीबाबत कर्नाटक महाराष्ट्राच्या पुढे होते. आता आपण पुढे आहोत, ही चांगली गोष्ट आहे. परंतु चार वर्षांची एकूण आकडेवारी पाहिल्यास, त्यामध्ये ठाकरे सरकारचा कार्यकाल व वाटा सिंहाचा होता. म्हणजे हे कर्तृत्व केवळ शिंदे, फडणवीस यांचे नाही, तर मुख्यतः ठाकरे सरकारचेच आहे! २०२२- २३ च्या आर्थिक पाहणी अहवालात महाराष्ट्र सरकारने तीन लाख ५७ हजार कोटी रुपयांचे गुंतवणुकीचे प्रस्ताव मंजूर केले, जे देशात सर्वाधिक होते आणि तेव्हा ठाकरे सरकार सत्तेवर होते. आर्थिक पाहणी अहवालातीलच ही माहिती आहे. त्यावेळी कर्नाटक आणि गुजरातला आपण मागे टाकले होते. देशांतर्गत आणि विदेशी गुंतवणुकीत देखील ठाकरे सरकारची कामगिरी सर्वोत्तम होती. शिंदे सरकार आल्यानंतर विदेशी गुंतवणुकीत लक्षणीय वाढ झाली आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. परंतु आपली गोष्ट मोठी करून सांगण्यासाठी, विरोधी पक्ष नालायक आहेत असे दाखवायचे, सोईस्कर आकडेवारी देऊन दिशाभूल करायची, हे देवेंद्रजी वारंवार हा करतात? ते सतत लबाडीचा युक्तिवाद करतात, म्हणून हे सांगणे भाग आहे. शिवाय करोनाकाळ असूनही महाविकासची उद्योग क्षेत्रातील कामगिरी लखलखीत होती, हे पुन्हा एकदा सांगतो. शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात करोना नव्हता! वित्तीय क्षेत्रातील जगविख्यात अशा 'ब्लॅक स्टोन' कंपनीचे अध्यक्ष स्टीफन श्वार्झमन यांच्या अध्यक्षतेखालील एक शिष्टमंडळ उद्धव ठाकरेंना ते मुख्यमंत्री असताना भेटले होते. या कंपनीस सरकारने दिलेल्या प्रतिसादाबद्दल ते एकदम खूष झाले होते. काही सार्वजनिक हिताच्या प्रकल्पांमध्ये या कंपनीस गुंतवणूक करायची होती. महाविकास सरकारचा सर्व कारभार निर्दोष आणि सर्वोत्तम होता, असे मुळीच नाही. त्या सरकारच्या कारभारात अनेक दोष होते. परंतु महाविकास सरकार जर महावसुली सरकार होते,असे म्हणणार्यांना, आत्ताच्या सरकारवरील भ्रष्टाचाराच्या आरोपांबद्दल काहीच कसे वाटत नाही?तरीसुद्धा या सरकारला लोकांनी महावसुली नव्हे, तर महापरतफेड सरकार म्हणायचे का? हे देवेंद्रजींनी सांगून टाकावे... एकूण, प्रसारमाध्यमांवर प्रभाव गाजवून आपल्याला हवे त्या पद्धतीने मुद्दे ठसवायचे, हे सध्या सुरू आहे. पत्रकारांनी या सरकारला देखील प्रश्न विचारलेच पाहिजेत! ते सहसा विचारले जात नाहीत, म्हणूनच त्याचा ठामपणे प्रतिवाद करणे आवश्यक आहे!

व्हायरल

छोट्या गोष्टींवरून लग्ने मोडू नका

माझ्या एका मित्राचा मुलगा सुद्धा लग्नाळू आहे, त्याने MBA केलं आहे. पण अजून तो फ्रेशर आहे..

पण.. फ्रेशर असताना देखील, दोनेक वर्षात त्याला एका मोठ्या कम्पनीमध्ये.. वार्षिक साडेचार लाख रुपयांचा पॅकेज मिळाला आहे. वधुवर सूचक मंडळात.. या मुलाची पसंती झाली, आणि त्यांना मुलीच्या आई वडिलांनी घरी बोलावलं. माझा हा मित्र फार साधाभोळा आहे, एखादा बोलता व्यक्तीसोबत असावा म्हणून, बोलणी करायला तो मला देखील सोबत घेऊन गेला.

मुलाला मुलगी पसंद पडली, मुलीला सुद्धा मुलगा पसंद पडला..माझ्या मित्राचे.. म्हणजे मुलाच्या बापाचे.. पुण्यात दोन फ्लॅट आहेत, शिवाय.. पुण्यातील मध्यवर्ती भागात वडिलोपार्जित काही जागा वादात अडकून आहे, तो विषय निराळाच. म्हणजे..खाऊन पिऊन अगदी सुखी कुटुंब आहे. आणि चुकून हा जागेचा प्रश्न मिटल्यास, जागेवर करोडपती होणार, असा काहीसा शॉट आहे. पण..सगळी बोलचाली झाल्यावर, एका गोष्टीवरून गाडी मधेच अडकली. आणि कुठेतरी माशी शिंकली.!! मुलीची आई म्हणे, की.. आमच्या मुलीला वार्षिक साडेसहा लाखांचा पॅकेज आहे, त्यामानाने तुमच्या मुलाला फार कमी पगार आहे.

मुलीला मुलगा आवडला होता, ती बिचारी आशेने मुलाकडे पाहात होती. शेवटी कितीही केलं तरी, काहीवेळा एका क्षणात प्रेम होऊन जातं, काहींना याचा अनुभव देखील आला असेल.मी हे सगळं पाहत होतो.. पण त्या मुलीच्या आईला काय बोलावं.? ते माझ्या मित्राला आणि त्याच्या बायकोला काही समजेना.शेवटी मी म्हणालो.. प्रश्न फक्त दोन लाखांचा आहे ना.?

तर एक काम करा.. मुलीच्या पगारातून, वार्षिक दोन लाख रुपये तुम्ही ठेऊन घ्या, म्हणजे विषय अगदी समसमान होईल. पण ज्यावेळी मुलाचा पगार मुलीपेक्षा जास्ती वाढेल, त्यावेळी काय करायचं ते पण सांगा.? ==मी हे खोचक बोललो काय, आणि त्यांना पटलं काय.. सगळा एकच विषय झाला, त्यानंतर त्याठिकाणी एकच हशा पिकला, आणि लागलीच त्या लग्नाची सुपारी फुटली.

मुलगी खुश, मुलगा खुश, मित्र खुश, त्याची बायको खुश.. मुलीचे आईवडील पण खुश, पण सगळ्यात जास्ती खुश होती ती मुलगी.हा विषय झाल्यावर.. त्या नवरी मुलीच्या डोळ्यात आलेलं पाणी (आनंदाश्रू) मी पाहिलं होतं..सगळे सोपस्कार आटोपून झाल्यावर, नवरा मुलगा आणि नवरी मुलगी पुन्हा एकदा सर्वांच्या पाया पडायला आली. आम्ही त्यांना भरभरुन आशीर्वाद दिले. त्यानंतर.. मुलगा आणि मुलगी थोड्या गप्पा मारण्यासाठी पार्किंगमध्ये गेले, आणि मित्राच्या मुलाचा मला फोन आला..

काका, एक मिनिटं खाली पार्किंगमध्ये या ना.

मी खाली गेलो.. त्या दोघांना भेटलो, मुलगी म्हणाली, तुम्हाला स्पेशल थँक्स म्हणण्यासाठी मीच तुम्हाला खाली बोलावलं. आणि म्हणाली.. माझी आई लै खडूस आहे, लग्न झाल्यावर ती माझ्याकडून वार्षिक दोन लाख रुपये घेऊनच राहील. मी म्हणालो.. तुझं काय म्हणनं आहे.?ती मुलगी म्हणाली..लग्नानंतर मला माझा संसार महत्त्वाचा आहे, लग्न झाल्यावर माझ्या पगारातील एक रुपया सुद्धा मी कोणाला देणार नाहीये, आणि आईला तर नाहीच नाही. मी म्हणालो...आता फक्त हो म्हणायचं, आणि नंतर मनाला वाटेल तेच करायचं. या वाक्यावर.. ती मुलगी बाकी फार खळखळून हसली, आणि आमचा मुलगा फक्त तिच्याकडे कुतूहलाने पाहात राहिला होता.

(टीप :- छोट्या छोट्या गोष्टींवरून मुलामुलींची लग्न मोडू नका, योग्य विचार करून पावलं टाका, कारण.. लग्न झाल्यावर, मुलं मुली कोणाचीच नसतात. ते फक्त एकमेकांचे नवराबायको असतात.)

- पांडुरंग कुंभार

लोकसंसद

अन्यायाविरूध्द लढणारे दैनिक

कृषीवल म्हणजे जनसामान्यांवर होणाऱ्या अन्यायाविरूध्द लढणारी दुधारी तलवार आहे. मी कित्येक वर्ष वाचक असून हे दैनिक निर्भिडपणे अन्यायाविरूध्द न्याय मिळवून देण्यासाठी सतत झगडणारे वृत्तपत्र आहे. पेण शहरातील अनेक समस्यांवर सडेतोड बातम्या लावून ते प्रश्नन सोडवण्यासाठी कृषीवल अविरतपणे झटत आहेत. अशा या वृत्तपत्राला शुभेच्छा.

दिपश्री पोटफोडे, शिवसेना (ठाकरे गट)

दैनिक कृषीवलच्या सात जूनच्या अंकात वरील पत्राचा मथळा अनवधनाने चुकीचा पडला होता. त्याबद्दल क्षमस्व.

आधुनिकतेची कास

कृषीवलच्या वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छा. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अन्यायाविरुद्ध सुरु झालेल्या या छोटेखानी वृत्तपत्राचा आता मोठा विस्तार झालेला आहे. जिथे जिथे अन्यायाविरोधात कृषीवल नेहमीच अग्रेसर राहिला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना कृषीवल हा मोठा आधार वाटत आलेला आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातही कृषीवलने आपली प्रतिमा उंचावत ठेवलेली आहे. भविष्यातही अशीच प्रगती होत राहो, आधुनिकतेची कास धरुन कालानुरूप बदल झाला असला तरी मुळ आत्मा मात्र आहे तसाच आहे. पुनश्च शुभेच्छा.

विजय थळे, नेहुली, अलिबाग

दिन वार्ता

पंचांग

९ जून २०२३
शुक्रवार
विक्रम संवत्- २०७९
ज्येष्ठशके संवत्- १९४५
संवत्सर - शोभननाम
अयन- उत्तरायण
मास- ज्येष्ठ
ऋतु- ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:षष्टी १६:२०:५९
नक्षत्र:धनिष्ठा १७:०९:१७
योग:वैधृति १५:४६:०२
करण:वणिज १६:२०:५९
करण:विष्टि २७:०८:५५+
सूर्य:वृषभ
चन्द्र:कुम्भ०६:०१:५७
हिजरी सन् - १४४४
मुस्लिम मास - जिल्काद
तारीख - २०
विशेष
गोविंद महाराज पुण्यतिथी - सोनगिरी (धुळे)

सुडोकू

	1	6						
7				2		1		5
3	2				1		7	
4					2		8	
6	5			4			3	7
	3		5					4
	6		1				5	3
8		5		3				9
						8	6	

PRESS SERVICES OF INDIA

गुरुवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

1	7	3	9	2	6	4	5	8
9	2	8	4	7	5	3	6	1
5	4	6	3	1	8	7	2	9
8	9	1	2	6	7	5	4	3
7	6	4	5	3	9	8	1	2
3	5	2	8	4	1	6	9	7
2	3	9	6	8	4	1	7	5
4	8	7	1	5	2	9	3	6
6	1	5	7	9	3	2	8	4

PRESS SERVICES OF INDIA

गोशाळा परिसरात कचऱ्याचे ढीग

भटक्या कुत्र्यांमुळे कचरा रस्त्यावर; पर्यटकांच्या मार्गात अडथळा

। नेरळ । वार्ताहर ।

माथेरान हे पर्यटन स्थळ थंड हवेसाठी आणि तेथील स्वच्छतेसाठी प्रसिद्ध आहे. येथे असलेल्या गोशाळेच्या परिसरात प्लास्टिक कचऱ्याचा विळखा पडलेला दिसून येत आहे. याच ठिकाणी दोन महिन्यांपूर्वी कित्येक टन कचरा वनप्रेमी तरुणांनी उचलून कर्जत येथील कचरा डेपो येथे हलविण्यात यशस्वी ठरले होते. या शहराचा महाराष्ट्र शासनाचे अनेक वेळा स्वच्छतेबद्दल सन्मान केला आहे. त्यामुळे सातत्याने शहरातील स्वच्छता कायम राखण्यासाठी प्रयत्न केले जात असतात.

राकेश कोकळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जंगलात फिरून गोळा केलेला कचरा गोशाळा येथे संकलित करून ठेवण्यात आला होता. त्याच परिसरात येणारे पर्यटक यांच्याकडून गोशाळा येथील कोपऱ्यात कचरा टाकण्यात येत आहे. याच भागातून अलेक्झांडर पॉईंटकडे जाणारा रस्ता आहे. याच अलेक्झांडर

पॉईंटकडे जाणारे पर्यटक हे गोशाळा भागातून जाताना नाकावर हात ठेवून पुढे जाताना दिसतात. त्या भागातून जाणारे पर्यटक आणि स्थानिकांना दुर्गंधीचा सामना करत आहेत.

माथेरानमधील अनेक भागातील पॉईंट परिसरात कचरा, रिकामी पाण्याच्या बाटल्या तसेच येथील शौचालयात खूप घाण, दुर्गंधी, अस्वच्छता पसरली असल्याची तक्रार येथील दुकानदार समाजमाध्यमांवर करीत असून नगरपालिकेने त्वरित याकडे लक्ष देऊन हा पॉईंट, परिसर स्वच्छ करावा अशी मागणी या पॉईंट परिसरातील हे छोटेमोठे दुकानदार करीत आहेत.

सध्या पर्यटकांची मोठी गर्दी माथेरानमध्ये असून पर्यटक हे माथेरानची आर्थिक वाहिनी असल्याने पालिका त्या कचऱ्याकडे लक्ष देणार काय? असा प्रश्न वनप्रेमी राकेश कोकळे यांनी उपस्थित केला आहे.

धनगर समाज संघटनेतर्फे अहिल्यादेवी जयंती साजरी

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुका धनगर समाज संघटनेचे वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९८ वी जयंती नेरळ येथे साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नावे नेरळ गावामध्ये चौक असावा अशी मागणी करण्यात आली.

कार्यक्रमाला नेरळच्या सरपंच उषा पारधी, उपसरपंच मंगेश म्हस्कर, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, माजी सदस्य सावळाराम जाधव, गीतांजली देशमुख, शिवली पोतदार, उमा खडे, जयश्री मानकामे, श्रद्धा कराळे, केतन पोतदार, प्रभाकर देशमुख, हेमंत क्षीरसागर, उज्ज्वला

धनगर, सुनिता आखाडे, रुपाली शिंगाडे, पंढरीनाथ खांगटे, संजय कांबळे, सुजित धनगर, अभिषेक कांबळे, आरती खराटे, नीलिमा शिंगाडे, अभिश्री कांबळे,सुनिता आखाडे, डॉ. महेंद्र बेरगळ, ॲड.हृषीकेश कांबळे, सम्यक सदावर्ते, संजय सदावर्ते आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश खराटे यांनी केले.

रजनी गुरव, लीना बडेकर यांना पुरस्कार प्रदान

। रसायनी। वार्ताहर ।

महाराष्ट्र शासन आणि महिला व बाल विकास मंत्रालय यांसकडून सामाजिक क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल ग्रामपंचायत स्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या पुरस्काराने रजनी पांडुरंग गुरव तसेच कु.लीना ज्ञानेश्वर बडेकर यांना सन्मानित करण्यात आले. हा सन्मान सोहळा कार्यक्रम सोमवार दि.५ रोजी पार पडला.

यावेळी तुपगाव ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र कुंभार, उपसरपंच सुयोग भालेकर, सदस्य शरीफ भालदार, निलेश मोरे, कांता नागावकर, स्वाती जाधव, अश्विनी मोरे व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

कीर्ती भोनकरला ९४.८० टक्के गुण

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या अशोकदादा साबळे विद्यालयाची गुणवंत विद्यार्थीनी कीर्ती बाळाराम भोनकर या विद्यार्थिनीने ९४.८० टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तिने मिळविलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिने मिळविलेल्या यशाबद्दल

महसूल खात्याच्या अधिकारी प्रशाली जाधव-दिघावकर, तहसीलदार विकास गारुडकर, माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सुभाष केकाणे, संगीता बक्कम, शैलेश भोनकर, राजेंद्र शिर्के, रवींद्र अर्बन, डी. एम. जाधव, माणगाव तहसील कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी, साले ग्रामस्थ यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शब्दकोडे क्र.१४८



आडवे शब्द :१. ठगविणारा, फसवणारा, ३.पवित्र, पतित, ५. बुटका मानव, ७.पाच पेंढयांचा जुडगा, ९.साठवणे,जमा करणे, १०.भवन, सदन, ११. अखंड, सतत, १३. उंदीर, १४. पलंग विणण्याची कापडी पट्टी, १६. थोडे, अल्प, जास्त नसलेले, १७. जड नसलेला, १८. वर्तुळ, रिंगण, १९. एक पवित्र नदी, २०.नववधु, '--- मिळे नसऱ्याला' एक मराठी चित्रपट, २२. पंख, पीस, २४. शिवरायांचा राज्यभिशेक करणारा पंडीत '-- भटट्', २५. कनातीची झोपडी, तंबु, २६. चोराचे काम हे करणे, २७. बुध्दीबळातील गोटी, २८.'देव तारी त्याला कोण --', २९. अंत, सिमा, ३०.फुरसत, अवधी, वेळ, ३२.सात नंबरचा, ३४.दर, 'मनी नाही -- म्हणे देवा मला पाव, ३७. मृदू, कोमल, ३९. काटा उलटा करा, ४१. एक दाळ प्रकार, ४३. प्रभात, पहाट, ४५. धुर्त, ठग, ४६. रूचकर, स्वादिष्ट, ४७. रात्री घातलेली पाळत, ४८. जामखीळ, ४९. हत्ती, ५१. वाईट सवय, लत, झाडाचा खालचा आणि जमीनीवरचा भाग, ५३. वरद विनायक या गावचा, ५६. कात उलटी करा, ५७. एक मादक पदार्थ, ५८. फुल उमलण्यापूर्वीची स्थिती, ५९. दासबोध रचयीते एक महान संत, ६१. तळे, सरोवर, ६३. सबब, निमित्त, ६६. फळातील गर, ६९. इंग्रजीत तीन, ७०. गाडीवरील आच्छादन, ७२. राजाचे बसावयाचे साधन, ७४.वरकरणी, बाहयात्कारी, ७८. आजीची आई, ७९. हिंदीत आंबा, ८०. रावणाचा झोपाळु भाऊ, ८२. बांग्लादेशचे चलन, ८३. एक गोड तांबुस कंदमुळ, ८४. गाढव, गर्दभ.

उभे शब्द : १. शिक्का, छाप, २. धाक, जरब, ४.जंगलात लागलेली आग ५.तिर्थस्थळाची नित्याने वारी करणारा, ६. तपकीर, नाडी, ७. वेडा, खुळा, 'दिल तो --- है' एक हिंदी चित्रपट, ८. मोठ्या भावाला संबोधायचा एक शब्द, ९. संदेह, शक, १२. लाट, तरंग, १३. तनय, पुत्र, १४. एक मोठे वाद्य, १५. क्रिकेटमधील धाव, १८. शिवाय, वाचुन, १९. ऊसाचा सोललेला बारीक तुकडा, २१. विल्हेवाट, योग्य ठिकाणी लावणे, २२. लोखंडाचे सोने करणारा काल्पनिक दगड, २३.लहान मुलांचे लेखणीने लिहीण्याचे साधन, २७. हत्ती याने पाणी पितो, २८. पिकावर पडणारा एक रोग, २९.एक द्विदल धान्य प्रकार, ३१. वसाहत, कॉलनी, ३२. कस, सत्व, ३३. लमत उलटे करा, ३५. गावाशेजारची छोटी वस्ती, तांडा, ३६. मंदिराचा दुरून दिसणारा भाग, शिखर, ३७. नव्यानेच आलेला, ३८. कजाग,भांडणे करणारा, ४०. बगल, बाजु, ४१. जेथुन निर्मीती होते ते स्थान, ४२. खडा, पत्थर, ४४. कर्म, काज, ५०. कर वसुल करण्यासाठी --- नाक्यावर वाहने अडवली जातात, ५२. सडलेला, नासका, ५४. कर, हस्त, ५५. तंबी, समजावणे, ५७. ही जिभेने कळते, ५८. सुक्ष्म अंश, ५९. क्रोध, संताप, ६०. खरे, अस्सल, ६२. तिबेटी धर्मगुरू'दलाई --', ६४. रत्न ग्रामीण, ६५. वेतन, ६६. सुसर, ६७. डामडौल, ६८. मोठा, भव्य, ७१. ध्वज, झेंडा, ७२. जंगलाचा राजा, ७३. काहीही परीश्रम न घेता, ७४. वांती, ओकारी, ७५. न्हाव्याचे एक हत्यार, ७६. आकाश, गगन, ७७. कान, ८०. एक रास, ८१. कविता करणारा.

शब्दकोडे क्र.१४७ चे उत्तर

आडवे उत्तर : १. सलाम, ४. लब, ६. वारकरी, ९. दरवाजा, ११. मामला, १२. सकारण, १४. मतदार, १६. ईन, १८. सुगरण, २०. भात, २१. लगत, २२. सेतू, २४. रबर, २६. वसंत, २७. सबब, २८. वळ, २९. वडा, ३०. दारा, ३१. निदान, ३३. कसदार, ३५. वास, ३६. टन, ३७. कम, ३८. हेवा, ३९. मलम, ४०. गड, ४१. कमाल, ४३. शुगर, ४५. तिसरा, ४७. सुरमा, ४८. रमारमन ४९. नयन, ५०. माता, ५१. लीद, ५३. सुमन, ५४. कलर, ५५. नीर, ५६. रहीम, ५९. साद, ६०. किर, ६२. गजरा, ६४. वरवर, ६५. कळशी, ६६. खडावा, ६७. नफा, ६८. नदारा, ७०. लमर, ७२. नमक, ७३. साल, ७५. गोगलगाय, ७७. काजवा, ७९. सवा, ८०. शत, ८१. हवालदिल, ८२. मनमुराद.

उभे उत्तर
१. समाज सेवक, २. लाम, ३. मलाई, ४. लस, ५. बकासुर, ६. वानर, ७. कम, ८. रितभात, ९. दर, १०. वारांगणा, १३. रग, १५. दात, १७. नरवर, १९. नवकोट नारायण, २१. लहान, २३. तुळस, २५. बडा, २७. बदाम, ३०. बासमती, ३१. निकड, ३२. सवाल, ३४. दानशुर, ३५. वाल, ३८. हेमा, मालिनी, ३९. मरण, ४०. गस्त, ४१. कर, ४२. परकर, ४४. गमन, ४६. सनम, बेवफा, ४७. सुतारकी, ५०. माल, ५२. दरवेशी, ५४. कदरदान, ५७. हिजडा, ५८. बारा, ५९. सावन, ६१. रकम, ६३. जलमय, ६६. खरगोश, ६९. रामराम, ७०. लगाम, ७१. रवादि, ७३. सासरा, ७४. लवाद, ७६. गत

पान १ वरुन

टपरीवाल्यांची मुजोरी जीवावर

पोलिस ठाण्यात समजताच पेण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी घटनास्थळी तातडीने पेण पोलिस स्टेशनशी गुन्हा प्रकटीकरण पथकाला पाठवले. मयताच्या नातेवाईकांनी दिपीका नारळ दुकानावर हल्ला चढवून फोडण्याचा प्रयत्न केला परंतु पोलिसांनी समयसुचकता दाखवत हा प्रसंग टाळण्याचा प्रयत्न केला.

पेणमध्ये मंदिरचोरी प्रकरणी परप्रांतियालाअटक

पोलीस आत्ता पेण कोळीवाडयातून झालेल्या चोरीबाबत आरोपीकडे सखोल चौकशी करीत आहेत.

पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत काळे व पोलीस टीमने अवघ्या काही तासात चोराला पकडल्याने पेण पोलिसांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. चावडी नाका येथील गणपती मंदिरात झालेल्या चोरीच्या घटनेची फिर्याद (पुजारी) वासुदेव परांजपे यांनी पेण पोलीस ठाण्यात दिली आहे.

पाण्यात बुडून एकाचा मृत्यू

वाचविण्यात यश आले. याबाबतची तक्रार नितीन शाम मोरे यांनी श्रीवर्धन पोलीस स्टेशन मध्ये दिली असून. अकस्मित मृत्यूची नोंद श्रीवर्धन पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मृत्यू झाल्याची घटना कळताच उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे नातेवाईक मित्र नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

शहापूरच्या शेतकऱ्यांचा पुन्हा एल्गार

३२- १ ची नोटिस बजावल्याने शेतकरी संतप्त झालेले होते. प्रकल्पाच्या नावाखाली राज्यकर्त्यांनी जमिनी ओसाड ठेवल्या. कोणताही विकास केला नाही. पुनर्वसनाचा कायदा लागू करण्यासंदर्भात राज्यपाल आणि प्रशासन यांच्यात चर्चा होऊनही कोणतीही कार्यवाही केलेली नाही,असा आरोप या प्रकल्पग्रस्तांचा आहे.

आधी जमिनीचा मोबदला द्या,मगच मोजणी करा,अशी मागणी शेतकरी निवृत्ती पाटील,नितीन पाटील, सुहास पाटील,दिनेश पाटील, निवास म्हात्रे आदींनी केली आहे.

महिलेच्या मृतदेहाचे तुकडे मीरारोडमधील घटना

तेव्हा पाहिले की, सरस्वती बेडवर मृतावस्थेत पडली होती आणि विष प्राशन केल्याने तिच्या तोंडातून फेस येत होता. सरस्वतीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी माझ्यावर गुन्हा दाखल होईल, अशी भीती मला वाटत होती. म्हणूनच मी तिच्या प्रेताचे तुकडे केले आणि नंतर त्याची विल्हेवाट लावली, असे मनोजने सांगितले.

पहिल्या डावात भारताची घसरगुंडी

स्मिथने पहिल्या दिवसी ९५ धावांवर नाबाद होता. दुसऱ्या दिवसाचा खेळ सुरु झाल्यानंतर आक्रमक रुप घेत शतकाला गवसणी घातली. स्मिथ याने २६८ चेंडूत १२१ धावांची खेळी केली. या खेळीत त्याने १९ चौकार लगावले. लॉर्ड शार्दूल ठाकूर याने स्मिथ याला बाद करत भारताला मोठं यश मिळवून दिले. पण त्यापूर्वी स्मिथने आपले काम पूर्ण केले. स्टिव्ह स्मिथ याने भारताविरोधात नववे शतक झळकावत नव्या विक्रमाला गवसणी घातली. भारताविरोधात सर्वाधिक शतके झळकावणाऱ्या फलंदाजात तो जो रुटसोबत पहिल्या क्रमांकावर पोहचलाय. भारताविरोधात जो रुट आणि स्मिथ यांनी प्रत्येकी नऊ नऊ शतके झळकावली आहेत. रिकी पॉंटिंग, गॅरी सोबर्स आणि विव रिचर्ड्स यांनी भारताविरोधात प्रत्येकी आठ आठ शतके झळकावली आहेत. ओव्हल मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात दुसऱ्या दिवशी तिसऱ्याच चेंडूवर ऑस्ट्रेलियाचा उपकर्णधार स्टीव्ह स्मिथ याने आपले शतक पूर्ण केले. सिराजच्या चेंडूवर लागोपाठ दोन चौकार लगावत स्मिथने शतकाला गवसणी घातली.

कर्जापोटी केली देवांची चोरी

कळविण्यात आली होती. मंदिरात असलेल्या लाकडी देव्हारात पन्नास वर्षापुर्वीच्या मल्हारी मार्तंड, म्हाळसा, भैरीदेवीच्या चांदीच्या मोठया मूर्ती व काळभैरव देवाच्या सहा मूर्ती होत्या. घटनास्थळी रेवदंडा पोलिस पोलिस निरिक्षक देवीदास मुपडे तात्काळ पोलिस कर्मचारीवर्गासह उपस्थित राहिले, चोरीच्या घटनेचे गांर्भिय व स्थानिक कोळी समाजाच्या भावना लक्षात घेऊन अलिबाग गुन्हे अन्वे. विभागाचे पो.नि. देवानंद गावडे यांनी सुध्दा घटनास्थळी लागलीच धाव घेतली, लागलीच पोलिस तपास सुरू करण्यात आला.

वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली या गुन्हाच्या तपासकामी रेवदंडा पोलिस ठाणे व अलिबाग गुन्हे अन्वेषक विभागाचे दोन पथके तयार करण्यात आली होती. तपास पोलिस पथकास सीसी फुटेज गोळा करणे, रेखाचित्र तयार करणे, स्थानिक ग्रामस्थाकडून गोपनिय माहिती प्राप्त करणे, रेकॉडवरील आरोपी चेक करणे, सायबर सेल मदतीने तांत्रीक विश्लेषण करणे आदी कामे देण्यात आली होती.

मिळालेल्या माहितीच्या आधारे महेश चायनाखवा यांनीच मंदिरातील चोरी केली असल्याचा संशयावरून त्याच्यावर पाळत ठेवण्यात आली. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्यास चौकशीसाठी पोलिसांनी ताब्यात घेतले असता त्यांनी कर्ज परतफेडी करीता चोरी केल्याची कबु ली दिली. त्याला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. खंडोबा मंदिरात चोरलेल्या चांदीच्या सर्व मूर्ती एकूण शंभर टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. गुन्हाच्या तपासकामी तात्काळ पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलिस अधिक्षक अतुल झेंडे व उपअधिक्षक अरूण भोर यांचे मार्गदर्शनाखाली रेवदंडा पोलिस ठाणे इन्चार्ज पो.नि. देवीदास मुपडे, उपनिरीक्षक दीपक म्हशीलकर, अशोक पाटील, पी.डी. देसाई, दिनेश पिंपळे, अस्मिता म्हात्रे, सुषमा भोईर, राकेश मेहत्तर, मनोज दुम्हारे, पंजाब पोळे, व स्थानिक गुन्हे अन्वेषक विभागाच साठे, दबडे, चव्हाण हंबीर, लांबोटे,यांनी विशेष प्रयत्न पोलिस तपास कामी केले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

RFx No.	Description	Estimated Cost
Tend-17/ 23-24 **RFx No. 7000027642**	Supply & Installation of WTI and OTI of ICT and EHV Transformers at various Substations under EHV (O&M) Circle, Panvel.	Rs. 28.88 Lakh

EMD 1% of Estimated Cost. **Tender Fee**: Rs. 500/- + GST **Submission of Bids:** From 08.06.2023 to 15.06.2023 up to 23:59 Hrs **Opening Date:** 16.06.2023 @ 11:00 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No. 9769006220. e-mail ID: **se7200@mahatransco.in**

Sd/-
Superintending Engineer
EHV (O&M) Circle, Panvel

अल्पमुदतीची निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत अंबर्ले करीता राज्य आपत्ती प्रतिसाद निधी/१५ वा वित्त आयोग २०२२/२०२३ योजनेअंतर्गत खालील कामाकरीता इच्छुक ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	काम पुर्ण करावयाचा कालावधी	निविदा सादर करावयाची			इसारा रक्कम	निविदा फॉर्म फी	योजना व वर्ग
				अंतिम तारीख	वेळ	ठिकाण			
१	कातळाचा कोंड पाणीपुरवठा योजना दुरुस्ती व पाईपलाईन वाढवणे	१३७७३१रु.	६ महिने	११/६/२३	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	१३७७	१00 रु.	१५ वा वित्त आयोग २०२२/२३
२	वडाचा कोंड सोमजाई मंदिराकडील अपूर्ण रस्ता तयार करणे	१७७२९0 रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	१७७३	१00 रु.	१५ वा वित्त आयोग २०२२/२३
३	जलशुद्धीकरण टिसीएल खरेदी करणे	४३२0३ रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	-		१५ वा वित्त आयोग २०२२/२३
४	राजिप शाळेतील मुलांना प्रोटीन पुरविणे	२३९५२ रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	-		१५ वा वित्त आयोग २०२२/२३
५	राजिप शाळांना नळ कनेक्शन व आरो फिल्टर बसविणे	३९१0७ रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	३९१	१00 रु.	१५ वा वित्त आयोग २०२२/२३
६	अंबर्ले रा.जि.प. शाळेला उंचावर टाकी बसवून कनेक्शन घेणे	४६३२४ रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	४६३	१00 रु.	१५ वा वित्त आयोग २०२२/२३
७	अंबर्ले रा.जि.प. शाळेला मैदानी साहित्य चाईल्ड फ्रेंडली साहित्य पुरविणे	६0५८६ रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	-	१00 रु.	१५ वा वित्त आयोग २०२२/२३
८	शाळांचे लाईट बिल भरणे	२00000 रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	-		१५ वा वित्त आयोग २०२२/२३
९	अंगणवाड्यांना पाणीपुरवठा करणे	२३२२४ रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	२३२	१00 रु.	१५ वा वित्त आयोग २०२२/२३
१0	महिलांना व किशोरवयीन मुलींना सेनीटरी नॅपकीन पुरविणे	२६८६२ रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	-	१00 रु.	१५ वा वित्त आयोग २०२२/२३
११	अंगणवाडी समोरील मैदानास भराव करणे	३२३३४ रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	३२३	१00 रु.	१५ वा वित्त आयोग २०२२/२३
१२	वैयक्तिक कचराकुंड्या खरेदी करणे	२६८६२ रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	-		१५ वा वित्त आयोग २०२२/२३
१३	बौद्धवाडी मधील साठवण टाकी दुरुस्ती	५00८६ रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	५00	१00 रु.	१५ वा वित्त आयोग २०२२/२३
१४	बौद्धवाडीमध्ये अंतर्गत रस्ता तयार करणे	३२३३४ रु.	६ महिने	-,,-	सायंकाळी ५.00 पर्यंत	ग्रा.पं. कार्यालय अंबर्ले	३२२	१00 रु.	१५ वा वित्त आयोग २०२२/२३

अटी व शर्ती

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील. आवश्यक असल्यास फी भरुन त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
२) प्राप्त निविदा दिनांक १२/0६/२0२३ रोजी दुपारी १२.३0 वा. ग्रामपंचायत कार्यालय अंबर्ले येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येईल.
३) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्टेशनचे दाखले सत्य प्रत केलेले असावेत व प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा भरण्यात यावी.
४) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच ग्रामपंचायत अंबर्ले यांनी राखून ठेवला आहे.
५) सुरक्षा अनामत रक्कमेपैकी १ टक्के रक्कम कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी भरावी लागेल व उर्वरीत रक्कम देयकातून कपात केली जाईल.
६) प्रत्येक देयकातून शासन निर्णयाप्रमाणे रकमा वजा केल्या जातील. व मा. गटविकास अधिकारी सो. पंचायत समिती माणगाव व उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा माणगाव याजकडील तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली सदर काम करावयाचे असून काम समाधानकारक नसेल तर ते काम त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
७) काम अंतिमरित्या पूर्ण झाल्यानंतर सहा महिनेपर्यंत देखभाल दुरुस्ती संबंधित ठेकेदाराने करावयाचे असून नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
८) सविस्तर अटी व शर्तीकरीता ग्रामपंचायत कार्यालयाकडे संपर्क साधावा.

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत अंबर्ले
ता.माणगांव जि.रायगड

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत अंबर्ले
ता.माणगांव जि.रायगड

निवडक

कारची चोरी

पनवेल : रस्त्यालगत उभ्या केलेल्या कारची अज्ञात चोरट्याने चोरी केली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस अधिक तपास करत आहेत. खारघर सेक्टर ३५ येथील बापूसाहेब ढास यांची मारुती कार इमारतीजवळ उभी केली होती. मात्र नंतर त्यांना गाडी त्या ठिकाणी आढळून आली नाही. त्यांनी आजूबाजूच्या परिसरात जाऊन गाडीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र गाडी न सापडल्याने गाडी चोरट्यांनी चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

चेनची चोरी

पनवेल : खारघर शहरातील हिरानंदिनी मार्केट चौक फिरायला गेलेल्या ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील चैन पाठीमागून आलेल्या दोन इसमांनी हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. ७१ वर्षीय कलावती मौर्य ह्या हिरानंदिनी मार्केट चौक येथे फिरायला गेल्या असताना त्यांच्या पाठीमागून आलेल्या दोन इसमांनी त्यांच्या गळ्यातील लॉकेटसह असलेली सोन्याची चेन खेचून पसार झाले आहेत. त्यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मोबाईलची चोरी

पनवेल : पनवेल हार्बर मार्गावर वाशी ते पनवेल प्रवासादरम्यान मोबाईल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करंजाडे येथे राहणारा आकाश पळसकर हा वाशी ते पनवेल दरम्यान लोकल रेल्वे प्रवास करत असताना अज्ञात इसमाने त्याच्याकडील ५५ हजार रुपये किमतीचा फोन अज्ञात चोरट्याने चोरून नेला. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तरुणाचे पलायन

पनवेल : पनवेल शहरातून एका १७ वर्षीय अल्पवयीन तरुणाला कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणसाठी पळवून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर तरुणाची उंची १६० सेमी असून त्याचा रंग सावळा, अंगाने सडपातळ, चेहरा गोल, दाढी बारीक डोक्याची केस बारीक कट केलेला, असे त्याचा वर्णन आहे. सदर तरुणाबाबत माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र ०२२-२७४५२३३३ संपर्क साधावा.

इसम बेपत्ता

पनवेल : तालुक्यातील इंडियाबुल्स कोनगाव येथून एक ३० वर्षीय इसम कोणास काही एक न सांगता घरातून निघुन गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. रोशन लाला महतो असे या इसमाचे नाव असून त्याचा रंग गोरा, उंची ५ फूट २ इंच, अंगाने सडपातळ असे वर्णन आहे. त्याला हिंदी, भोजपुरी भाषा बोलता येते. सदर इसमाबाबत कोणास काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी क्र ०२२-२७४५२४४४ संपर्क साधावा.

मिनीट्रेनला पावसाळी विश्रांती

१६ ऑक्टोबरपर्यंत प्रवासी वाहतूक बंद, प्रवाशांचा हिरमोड,

। नेरळ । वार्ताहर ।
पर्यटकांची लाडकी आणि देशातील पर्वतीय मार्गावर चालविली जाणारी झुकझुक गाडी १० जूनपासून पावसाळी विश्रांती घेण्यासाठी जात आहे. १० जूनपासून १५ ऑक्टोबर पर्यंत नेरळ माथेरान नेरळ मार्गावर प्रवासी मिनी ट्रेन चालविली जाणार नाही. दरम्यान, माथेरान अमन लॉज मार्गावर शटल सेवा सुरूच राहणार असून पर्यटकांसाठी ही सेवा नेहमीप्रमाणे सुरू राहणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने जाहीर केले आहे.

ब्रिटिश काळापासून ही ट्रेन पावसाळ्यात चार महिन्यांसाठी सुट्टीवर जात असते. त्यानंतर १६ ऑक्टोबर रोजी पुन्हा एकदा हिवाळी पर्यटन हंगामासाठी तयारीला लागणारी ही मिनी ट्रेन यावर्षी पाच दिवस आधीच बंद करण्याचं निर्णय मध्य रेल्वे प्रशासनाने घेतला असल्याने पर्यटक आणि प्रवासी नाराज झाले असून त्याचा परिणाम माथेरान मध्ये पर्यटन हंगामावर होऊ शकतो.

डोंगर भाग असल्याने पावसाळ्यात दरडी कोसळण्याची भीती असते. काहीवेळा अतिवृष्टी तर सतत मुसळधार पाऊस यामुळे घाटसेक्शन मध्ये काही ठिकाणी भूस्खलन ही होऊ शकते.

त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षा कारणास्तव ही मिनिट्रेन बंद करण्याचा निर्णय मध्य रेल्वे कडून घेण्यात आला आहे. सकाळी ०८:५० आणि १०:३५ वाजता नेरळ हुन माथेरानकडे जाणारी आणि माथेरान येथून दुपारी ०२:४५ वाजता आणि ४ वाजता नेरळ कडे जाणाऱ्या दोन अप-डाऊन मार्गाच्या गाड्या बंद ठेवण्यात येणार असल्याचे मध्य रेल्वे कडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगण्यात आले आहे. मात्र अमनलॉज-माथेरान या दोन किलोमीटर अंतरावरील मिनिट्रेन शटलसेवा आपल्या नियोजित वेळेनुसार पर्यटकांच्या सेवेसाठी धावणार आहे. दरम्यान प्रत्येक शनिवारी एक मिनी ट्रेन गाडी माथेरानसाठी नेरळ येथून रवाना होईल, मात्र त्या गाडी मधून कोणालाही प्रवास करता येणार नाही. ही गाडी घाट सेक्शनमध्ये उद्भवणारी कामे करण्यासाठी धावणार आहे तर शनिवार व रविवार वगळता दररोज मालगाडी या मार्गावर धावणार आहे. ही मालगाडी सकाळी ७ वाजता नेरळहुन सुटेल तर १०:४० येथे माथेरान ला पोहोचेल तर दुपारी १२:२५ ला माथेरान हुन सुटेल तर दुपारी ४:३० नेरळ येथे पोहोचेल असे मध्य रेल्वेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

बँक ऑफ इंडिया अधिकाऱ्यांचे रक्तदान शिबीर

। अलिबाग । वार्ताहर ।

बँक ऑफ इंडिया ऑफिस असो. मुंबई व गोवा यूनिट यांच्या ५९व्या स्थापना दिवस मुंबई, गोवा सहित अलिबाग येथ साजरा करण्यात आला. युनिटचे जनरल सेक्रेटरी यांच्या मार्गदर्शनाखाली बीकेसी मुंबई, पणजी-गोवा सोबत रायगड-अलिबाग येथे रक्तदान शिबीर आयोजीत करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन बँक ऑफ इंडिया, रायगड विभागाचे प्रमुख मुकेश कुमार, उपप्रमुख जॉन लोबो व बँक ऑफ इंडिया ऑफिस असोशियसनचे असिस्टंट जनरल सेक्रेटरी अजय सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा रुग्णालय, अलिबाग यांच्यामार्फत झालेल्या या शिबिरास बँकेचे अग्रणी जिल्हा प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी व अधिकारी संघटनेचे कमिटी मेंबर कालिदास माने यांची प्रमुख उपस्थिती होती. संपूर्ण रायगड जिल्हयातील बँक अधिकारी, व इतर कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून समाजासाठी मोलाचे सहकार्य केले.

रेती उपगटाच्या जाहीर लिलावास मुदतवाढ

। अलिबाग । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यातील सावित्री नदी-बाणकोट खाडी, (केंबुर्ली ते राजेवाडी), कुंडलिक नदी, रेवदंडा खाडी व सावित्री नदी, बाणकोट खाडी तसेच पातळगंगा नदी, धरमतरखाडी, रेवदंडा खाडी, राजपुरी खाडी व बाणकोट खाडी या खाडीपत्रामधील ड्रेजरद्वारे उत्खननासाठी राखीव असलेल्या रेती उपगटाचा जाहीर लिलाव ई- निविदेच्या प्रक्रिया दि.२९ मे ते ५ जून २०२३ या कालावधीसाठी राबविण्यात आली आहे. याप्रकरणी ५ जून २०२३ पर्यंत एकही निविदा प्राप्त झाली नसल्याने या निविदा प्रक्रियेस १५ जून पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे. या लिलाव प्रक्रियेसंबंधी सर्व माहिती, गटाचा-डेपोचा तपशील आणि गाळ अटी व शर्ती यांची सविस्तर माहिती https://mahatenders.gov.in तसेच www.raigad.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांनी कळविले आहे.

भीम अनुयायांचे तळा तहसीलदारांना निवेदन

। तळा । वार्ताहर ।

नांदेड शहरातील बोंडार (हवेली) येथील भीमसैनिक अक्षय भालेराव हत्या प्रकरणातील दोषींना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी तळा शहरात भीम अनुयायांनी मोर्चा काढून तहसीलदारांना निवेदन दिले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील बोंडार (हवेली) येथील मयत अक्षय भालेराव यानी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली म्हणून येथील मनुवादी क्रूर जातीयवाद्यांनी अक्षय भालेराव या बौद्ध समाजातील तरुणाची चाकूने भोसकून हत्या करून त्याचा भाऊ आकाश भालेराव याच्यावर देखील चाकुने वार करून त्याला जखमी केले. तसेच त्याच्या कुटुंबीयांचा देखील अमानुष छळ केला. या घटनेमुळे नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आरोपींविरुद्ध संतापाची लाट पसरली असून हत्या करणाऱ्यांविरुद्ध शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी तळा तालुक्यातील भारतीय बौद्ध

महासभा, बौद्धजन पंचायत समिती तसेच तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था (रजि.) रायगड या तिन्ही संस्थेने तळा शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसिल कार्यालय असा मोर्चा काढून तळा तहसीलदार स्वाती पाटील यांना निवेदन दिले.

कर्जतमध्ये कापडी पिशव्यांचे वाटप

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यात सार्वजनिक आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या रोटरी क्लब कडून आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिन साजरा करताना पर्यावरण जनजागृती रॅली काढण्यात आली आणि नंतर कापडी पिशव्यांचे वाटप क्लब कडून करण्यात आले.

रोटरी क्लब माध्यमातून शिक्षण,आरोग्य,कम्युनिटी डेवलपमेंट आदी क्षेत्रासोबतच पर्यावरण क्षेत्रातही खूप मोठ्या प्रमाणात कार्य होत आहे. त्याचाच एक भाग म्हणून रोटरी वलब यांच्या वतीने जागतीक पर्यावरण

दिनाचे औचीत्य साधून कर्जत शहरात प्लास्टिक विरोधी जनजागृती रॅली काढणायत आली.त्यात कर्जत शहरातील बाजारपेठ,लोकमान्य टिळक चौक येथे पर्यावरण सुरक्षा,सुरक्षा जनजागृती,प्लास्टीक पिशव्यांचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर करावा असा संदेश यावेळी नागरिकांना देण्यात आला.यावेळी कर्जत रोटरीचे अध्यक्ष सतीश शिरखंडे, तसेच अरविंद माळी, जितेंद्र ओसवाल, नंदन भडसावळे, जितेंद्र परमार, आदी सदस्य उपस्थित होते.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **वाडीत सासवणे अलिबाग** शेती/बागायती कामाचा अनुभवी जोडा हवा आहे. (१५०००) ८००७८९३२३२
- **लग्न मुहूर्ताला येणाऱ्या पाहुण्यांसाठी**, ग्रुप बुकिंगवर, हॉटेल रुम देणे आहे. भेटा नवीन हॉटेल 'द बनयन शेल्टर्स' चोंढी, मांडवा रोड. ९८५०४२७७२८, ९८२२२५७९२९
- **वाहन चालक पाहिजेत**– अलिबाग परिसरामध्ये गाडी चालवण्यासाठी एक अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क: ९८२००५९६९१
- **ड्रायव्हर पाहिजेत**– टेम्पो चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे. कार चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे. पनवेल परिसरात राहणाऱ्यांना प्राधान्य कॉल किंवा व्हाट्सअप: ९८२०२७५३५३
- **अलिबागमध्ये ऑफिस** कामाकरीता मुलगा पाहिजे १० वी पास. पगार ५०००-७००० मो.९९२३२३५०५६/९८२२४६१७६१
- **B.A.B.Ed, D.Ed,** B.Sc, BP ed शिक्षक/ शिक्षिका पाहिजेत पगार अनुभवानुसार आपला बायोडाटा ८३९०९०९४७० या नंबरवर व्हॉट्सअप करा. तसेच अलिबाग ऑफिसाठी अकौंटस क्लार्क पाहिजेत.
- **तीनवीरा येथील प्लॉस्टिक** फॅक्टरीसाठी ऑपरेटर व हेल्पर पाहिजेत आपला बायोडाटा ८३९०९०९४७० वर व्हॉट्सअप करा.
- **वायशेत येथे रोडटच** दुकान गाळे भाड्याने देणे आहेत. एच पी गॅस कं. उसर च्या पुढे २० गुंठे शेतजमिन विकणे आहे. ९४२११७०३५७
- **अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी** मुलगा किंवा मुलगी पाहिजे. शिक्षण - B.A किंवा B.com संपर्क : ९८२००५९६९१
- **कॉटेज भाड्याने पाहिजे** ७०६६१३८३६८
- **जमीन विकणे आहे.** ७८७५५८७०८४
- **चोंढी-किहीम शेडटच दोन गुंठे जागेमधील ४ गाळे व घर** (एकत्र) विकणे आहे. ७८७५५२२८८८, ९८५००६३३२६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

श्रीकांत देशमुख यांचे निधन

। तळे । वार्ताहर ।

तळ्याचे मूळ रहिवासी आदर्श शिक्षक श्रीकांत सखाराम देशमुख यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांच्या राहत्या घरी वरळी मुंबई येथे नुकतेच निधन झाले. नंतर ते मुलुंडच्या नालिनिबाई गजानन पुरंदरे हायस्कूल मधून मुख्याध्यापक पदी निवृत्त झाले. विशेषतः मुलींनी शिक्षण घेऊन स्वतःचा पायावर उभे राहावे ह्या साठी त्यांनी प्रोत्साहन दिले..त्यांच्या निधनानंतर तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी मंडळ सभेमध्ये त्यांना श्रद्धांजली वाहून त्यांच्या प्रति आदर प्रकट केला.

श्रमिक विद्यालयात पर्यावरण दिन साजरा

। खांब । वार्ताहर ।

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे पर्यावरण दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय हरित सेनेचे विद्यार्थी व सामाजिक वनीकरण रोहा यांच्या वतीने संपन्न झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी परीक्षेत्र अधिकारी आशिष पाटील, नवपाल डी.बी.वाघे, धिरेश थळकर, सुनील लांगी, सुरेश वाघमारे, दिपक जगताप, पांडुरंग लोखंडे, रामदास नवघरे, रेश्मा शिंदे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमातंर्गत शालेय परिसरात विविध प्रकारचे रोपांची लागवड करून वृक्षारोपणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. तर विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण रोहा यांच्या वतीने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात रोपांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला.

पोलादपूर तालुक्यात टँकरने पाणीपुरवठा

। पोलादपूर । वार्ताहर ।

पोलादपूर तालुक्यातील बाळमाची, आंबेमाची, कुडपण खुर्द, नाणेघोळ, बोरावळे, चांभारगणी बुद्रुक, खडकवणे, गोलदरा, गोळेगणी, मोरगिरी, किनेश्वरगांव कुंभळवणे, तुटवली आदी महसूली गांवे आणि कामथे फौजदारवाडी, महालगूर मोरेवाडी, कातळीकामतवाडी, क्षेत्रपाळ धनगरवाडी आणि क्षेत्रपाळ कामतवाडी या १२ गावांतून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे प्रस्ताव आले आहेत. यानंतर जुन २०२३च्या पहिल्या आठवडयात चांभारगणी बुद्रुक आणि किनेश्वर या गांवांना तसेच कालवली गावातील पाटीलवाडी, पवारवाडी, भोसलेवाडी, मोहल्ला, बौध्दवाडी, विठ्ठलवाडी आणि

किनेश्वर पेढावाडी आणि तुटवली गळतीची वाडी, धामणदिवी भरणेची वाडी, महालगूर मोरेवाडी, बोरावळे कोडबेकोंड, वडघर पेढावाडी, वडघर सणसवाडी, वडघर फौजदारवाडी, नावाळे शेदवाडी, कातळी दत्तवाडी, आडावळे खडकवाडी, बोरघर महादेवाचा मुरा, कोतवाल खुर्द बागवाडी, रेववाडी, बेलाची वाडी, भोगाव पार्टेवाडी, साखर रिंगेवाडी, कापडे खुर्द राखीचा टोक, क्षेत्रपाळ आमलेवाडी, क्षेत्रपाळ धनगर वाडी, तुटवली धनगरवाडी या १२ गांवे आणि ३० वाडयांतील एकूण ४ हजार ७२१ लोकसंख्येला आणि एक हजार ३८२ पशूधनासाठी पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

रानबाजिरे एमआयडीसीच्या धरणातील पाणी टँकरद्वारे पुरवठयासाठी उपलब्ध होत नसल्याने यंदा लोहारे येथील बागडे फार्महाऊस येथे पाण्याचे खासगी अधिग्रहण करण्यात येऊन टँकर भरून पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची माहिती पोलादपूर पंचायत समितीचे अभियंता कांबळे यांनी दिली.

चौकमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

। चौक । वार्ताहर ।

एस.एस.सी परीक्षेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी आपली कामगिरी यशस्वीरित्या पाडली. यातच वावंढळ येथील कोयना पुनर्वसाहत गावातील विद्यार्थ्यांनी यावर्षी झालेल्या परीक्षेत चांगले यश संपादन केले आहे त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी या गावचे सरपंच सुहास कदम आणि ग्रामपंचायत सदस्य यांच्या प्रयत्नाने या यशस्वी विद्यार्थ्यांचा शिवराज्याभिषेक दिनी सत्कार करण्यात आला. यात स्वरा कदम. एच.डी.पी. न्यू इंग्लिश स्कूल, ७७ टक्के गुण, नीती कदम. स. ने. पा विद्यामंदिर, चौक या विद्यार्थिनीने ८६/ टक्के गुण मिळविले आहेत. पार्थ कदम, स्वयम शिंदे, सानवी कदम, सोहम कदम, यश कदम, कस्तुरी महाडिक, समीरा कांबळे, वैष्णवी पाटील. या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास ललिता काईनकर, वनिता कांबळे, एच.बी. केदारे, विद्यार्थी पालक उपस्थित होते.

चिंतामण म्हसकर सेवानिवृत्त

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील नांदगाव गावचे चिंतामण लक्ष्मण म्हसकर हे मुंबई उच्च न्यायालयातून नियत वयोमानानुसार ३१ मे २०२३ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानी उच्च न्यायालयात हमाल, शिपाई,ते हेडफायलर या विविध पदावर प्रामाणिकपणे काम केले. न्याय मूर्तींच्या दालनात ,विविध खटल्यात, तसेच बांयडरचे सुद्धा काम करीत असताना गेल्या ३७ वर्षात विविध अनुभव आले. त्यांच्या सेवापूर्तीच्या कार्यक्रमात नांदगाव ग्रामस्थांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी म्हसकर कुटूंबीय मित्र मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच त्यांचे पुढील आयुष्य सुखी व समृद्धीचे जावो यासाठी मा जिल्हा परिषद सदस्य सुरेश खैरे यांनी शुभेच्छा दिल्या.

मिरची, सुकी मासळी, कांदा, मसाल्याची जोरदार विक्री

आठवडा बाजारात खरेदीसाठी झुंबड

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।
पावसाळ्याला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे बुधवारी अलिबाग तालुक्यातील वरसोली आठवडा बाजारात ग्राहकांनी खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. सुकी मासळी, सुकी मिरची, मसाला घेण्यासाठी ग्राहकांची झुंबड उडाली होती.



तालुक्यातील नागरिक दर आठवड्याला लागणारे घरातील साहित्य आठवडा बाजारातून खरेदी करण्यासाठी येत असतात. या बाजारामध्ये अनेक वस्तू स्वस्त दरात मिळत असतात. यामुळे खास करून कामगार व शेतकरी बांधव बाजारात गर्दी करताना दिसतात.

परिसरात ग्राहकांची गर्दी असल्याचे चित्र पहावयाचा मिळाले. आजच्या वरसोली आठवडा बाजारात लाखो रुपयांची उलाढाल झाल्याचे चित्र पहावयास मिळाले. पावसाळ्यामध्ये ताजे मासे मिळणे कठीण असते. यामुळे पावसाळी हंगामात सुक्या मासळीवर समाधान मानावे लागते. बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात सुकी मासळी विक्रीसाठी आली होती. सुकट, अंबाड, बोंबील, वाकटी अशा खरेदीला ग्राहकांनी विशेष पसंती दिल्याचे पहावयास मिळाले.

कोलाडमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा

। कोलाड । वार्ताहर ।

कोलाड येथील तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचालित डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवे-लाड संस्थेचे संदीप तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.०६ जून रोजी ३५० वा शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. विश्वास देशमुख, उपप्राचार्या नेहल प्रधान, अमोल गोलीपकर, प्रा. रेश्मा शेळके, डॉ. साबळे सतीश, डॉ. अमरपुरे सूर्यकांत, प्रा. अनिरुद्ध मोरे, प्रा. दर्शना माळी, प्रा. अडलीकर जयवंती, प्रा. राधाकृष्णन कीती, प्रा. प्रतीक्षा पडवळ, प्रा. पाटील स्वप्नाली, प्रा हरणेकर निखिल, ग्रंथपाल करुणा बड़े, प्रा. बामुगडे, प्रा शिंदे आधी यावेळी उपस्थित होते.

मधुकर पाटील यांचे निधन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

कुरुळ येथील शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते, सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय सहभाग घेत असणारे मितभाषी, मनमिळाऊ मधुकर गणपत पाटील यांचे राहत्या घरी कुरुळ येथे २ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. निधना समयी ते ७५ वर्षांचे होते. त्यांनी एस. टी. महामंडळ मध्ये १९६८ ते २००६ पर्यंत यशस्वी सेवा करून निवृत्त झाले.

यांच्या पश्च्यात तीन भाऊ, एक बहीण, पत्नी, मुलगे महेश पाटील, महेंद्र पाटील, सुना तसेच नातवंडे असा मोठा पाटील परिवार आहे. त्यांचे दशविधी कार्य (दहावे) रविवार दिनांक ११ जून २०२३ रोजी सकाळी ठीक ७.३० वाजता कुरुळ येथे होणार आहेत. निधनाची बातमी समजताच शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी पाटील कुटुंबियांचे सांत्वन केले. या प्रसंगी त्यांच्या समवेत कुरुळ ग्रामपंचायत सदस्य अवधूत पाटील इतर सदस्य आणि पाटील कुटुंबिय मोठ्या संखेने उपस्थित होते.

अनिल अग्रवाल यांचे निधन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

लायन्स क्लब पोयनाडचे माजी अध्यक्ष मनीष किसनलाल अग्रवाल यांचे धाकटे बंधू अनिल अग्रवाल (वय ४८) यांचे नुकतेच निधन झाले. उत्तरकार्य पोयनाड येथील निवासस्थानी शुक्रवार, १६ जून रोजी होतील असे अग्रवाल कुटुंबियांनी कळविले आहे. अग्रवाल यांच्या निधनाबद्दल परिसरातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी शोक प्रकट करुन परिवाराचे सांत्वन केले आहे.

अलिबागमध्ये नविन योगाभ्यास वर्ग

। अलिबाग । प्रतिनिधी ।

श्री अंबिका योग कुटीर ठाणे, शाखा अलिबाग तर्फे रविवार दिनांक ११ जून पासून कर्णिक सभागृह, पंतनगर अलिबाग येथे नविन विनामूल्य त्रैमासिक योगाभ्यास वर्गाची सुरुवात होत आहे. वर्ग सकाळी ७.३० ते ९.३० ह्या वेळात होईल.वर्ग दर रविवारी दोन तास,असे सलग बारा रविवार चालतील. जास्तीत जास्त नागरिकांनी ह्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अलिबाग शाखेतील सर्व शिक्षकांतर्फे करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी, शाखा संचालक विरेंद्र पवार ९४२२६९००५८ यांच्याशी संपर्क साधावा.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

मुख्य संपादक

(THIS IS ONLY AN ADVERTISEMENT FOR INFORMATION PURPOSES AND NOT A PROSPECTUS ANNOUNCEMENT NOT FOR DISTRIBUTION OUTSIDE INDIA)

CFF FLUID CONTROL LIMITED

CIN: U28990MH2012PLC227023

Our Company was incorporated as Flash Forge Fluid Control Private Limited on February 16, 2012 under the Companies Act, 1956 with the Registrar of Companies, Mumbai, Maharashtra bearing Registration number 227023. The name of our company was changed to CFF Fluid Control Private Limited vide Special resolution dated September 21, 2012.The fresh certificate of incorporation consequent of name change was issued on October 19, 2012 by the Registrar of Companies, Mumbai, Maharashtra. Further the status of the Company was changed to Public limited and the name of our Company was changed to CFF Fluid Control Limited vide Special Resolution dated September 05, 2022. The fresh certificate of incorporation consequent to conversion was issued on September 15, 2022 by the Registrar of Companies, Mumbai, Maharashtra. The Corporate Identification Number of our Company is U28990MH2012PLC227023. For further details pertaining to the change of name of our Company and the change in Registered Office, please refer the chapter "History and Certain Corporate Matters" on page no.116 of this Prospectus.

Registered Office: Plot No 01, Survey No 96, Kumbhivli Madap Khopoli,Khalapur, Raigarh-410203 **Corporate Office:** 503, Delphi, A Wing, Orchard Avenue, Hiranandani Business Park, Powai, Mumbai-400076
Tel No.: +91 - 22 – 40021599; **Email:**compliance@cffdefensys.com; **Website:**www.cffdefensys.com **Contact Person:** Sonika Mehta, Company Secretary and Compliance Officer

Promoter of our Company: Sunil Menon and Gautam Makkar

BASIS OF ALLOTMENT

INITIAL PUBLIC OFFER OF 52,00,000 EQUITY SHARES OF ₹ 10 EACH ("EQUITY SHARES") OF CFF FLUID CONTROL LIMITED ("CFF" OR THE "COMPANY") FOR CASH AT A PRICE OF ₹ 165PER SHARE (THE "ISSUE PRICE"), AGGREGATING TO ₹ 8,580.00 LAKHS ("THE ISSUE"), OF WHICH 2,60,800 EQUITY SHARES OF ₹ 10 EACH WILL BE RESERVED FOR SUBSCRIPTION BY MARKET MAKER TO THE ISSUE (THE "MARKET MAKER RESERVATION PORTION"). THE ISSUE LESS MARKET MAKER RESERVATION PORTION I.E. ISSUE OF 49,39,200 EQUITY SHARES OF ₹ 10 EACH IS HEREINAFTER REFERRED TO AS THE "NET ISSUE". THE ISSUE AND THE NET ISSUE WILL CONSTITUTE 26.70% AND 25.36%, RESPECTIVELY OF THE POST ISSUE PAID UP EQUITY SHARE CAPITAL OF THE COMPANY.

ISSUE PRICE: RS. 165 PER EQUITY SHARE OF FACE VALUE OF RS.10 EACH
THE ISSUE PRICE IS 16.5 TIMES OF THE FACE VALUE

ISSUE OPENED ON: MAY 30, 2023 AND ISSUE CLOSED ON: JUNE 02, 2023

The Equity Shares of the Company are proposed to be listed on the SME Platform of BSE Limited, in terms of the Chapter IX of the SEBI (ICDR) Regulations, 2018 as amended from time to time. Our Company has received an In-Principle approval from BSE for the listing of the Equity Shares pursuant to letter dated January 19, 2023. **BSE shall be the Designated Stock Exchange for the purpose of this Issue. The trading is proposed to be commenced on June 12, 2023** (Subject to receipt of listing and trading approvals from the BSE Limited).

The Issue is being made through the Fixed Price process, the allocation in the Net Issue to the Public category shall be made pursuant to Regulation 253(2) of the SEBI (ICDR) Regulations, 2018, as amended from time to time, wherein a minimum of 50% of the Net Issue of shares to the Public shall initially be made available for allotment to Retail Individual Investors. The balance of Net Issue of Shares to the public shall be made available for allotment to Individual Applicants other than Retail Individual Investors and other Investors, including Corporate Bodies / Institutions irrespective of number of shares applied for. If the Retail Individual Investor category is entitled to more than 50% on proportionate basis, they shall be allotted that higher percentage. Under subscription, if any, in any of the categories, would be allowed to be met with spill-over from any of the other categories or a combination of categories at the discretion of our Company in consultation with the Lead Manager and the Designation Stock Exchange. Such inter-se spill over, if any, would be affected in accordance with applicable laws, rules, regulations and guidelines. All potential investors shall participate in the Issue only through an Application Supported by Blocked Amount ("ASBA") process including through UPI mode (as applicable) by providing details of the irrespective bank accounts and / or UPI IDs, in case of RIIs, if applicable, which will be blocked by the Self Certified Syndicate Banks ("SCSBs")

SUBSCRIPTION DETAILS

The Net Issue has received 4,850 applications for 1,01,54,400 Equity Shares resulting in 1.95 times subscription. The details of the applications received in the Net Issue (before and after technical rejections & withdrawal) are as follows:

Detail of the Applications Received

CATEGORY	Before Technical Rejections & Withdrawals		After Technical Rejections & Withdrawals	
	No. of Applications	No. of Equity Shares	No. of Applications	No. of Equity Shares
Retail Individual Applicant	4,391	35,12,800	4,334	34,67,200
Other than Retail Individual Applicant	519	64,38,400	515	64,26,400
Total	**4910**	**99,51,200**	**4,849**	**98,93,600**

Note: The Issue also includes 2,60,800 Equity Shares reserved for Market Maker, which was subscribed by 1.00 times and there were no Technical Rejection & any withdrawal.

In the event of oversubscription, the allotment will be made on a proportionate basis in marketable lots. There was over subscription of 39,56,800 Equity Shares in other than Retail Individual Category & over subscription of 9,97,600 Equity Shares in Retail Category. The Basis of Allotment was finalised in consultation with the Designated Stock Exchange – BSE Limited on June 07, 2023.

A) **Allocation to Market Maker (After Technical Rejections & Withdrawals):** The Basis of Allotment to the Market Maker, at the Issue Price of ₹ 165 per Equity Share, was finalised in consultation with BSE. The category was subscribed by 1.00 times. The total number of shares allotted in this category is 2,60,800 Equity Shares. The category-wise details of the Basis of Allotment are as under:

No. of Shares Applied for (Category Wise)	No. of Applications Received	% to Total	Total No. of Shares Applied in Each Category	% to Total	Allocation per Applicant	Ratio of Allottees to the Applicant	Total No. of Shares Allotted
2,60,800	1	100.00	2,60,800	100.00	2,60,800	1:1	2,60,800
Total	**1**	**100.00**	**2,60,800**	**100.00**			**2,60,800**

B) **Allocation to Retail Individual Investors (After Technical Rejections & Withdrawals):** The Basis of Allotment to the Retail Individual Investors, at the Issue Price of ₹ 165 per Equity Share, was finalised in consultation with BSE. Pursuant to Regulation 253(2) of the SEBI (ICDR) Regulations, 2018, the total number of shares allocated in this category is 24,69,600 Equity Shares. The category was subscribed by 1.40 times. The category-wise details of the Basis of Allotment are as under:

No. of Shares Applied for (Category Wise)	No. of Applications Received	% to Total	Total No. of Shares Applied in Each Category	% to Total	Allocation per Applicant	Ratio of Allottees to the Applicant	Total No. of Shares Allotted
800	4,334	100.00	34,67,200	100.00	800	3087:4334	24,69,600
Total	**4,334**	**100.00**	**34,67,200**	**100.00**			**24,69,600**

C) **Allocation to Other than Retails Category (After Technical Rejections & Withdrawals):** The Basis of Allotment to the Non – Retail Investors, at the Issue Price of ₹ 165 per Equity Share, was finalised in consultation with BSE. Pursuant to Regulation 253(2) of the SEBI (ICDR) Regulations, 2018, the total number of shares allocated in this category is 24,69,600 Equity Shares. The category was subscribed by 2.60 times. The category-wise details of the Basis of Allotment are as under:

No. of Shares Applied for (Category Wise)	No. of Applications Received	% to Total	Total No. of Shares Applied in Each Category	% to Total	Allocation per Applicant	Ratio of Allottees to the Applicant	Total No. of Shares Allotted
1,600	53	10.29	84,800	1.32	800	41:53	32,800
2,400	197	38.25	4,72,800	7.36	800	1:1	1,57,600
-	-	-	-	-	800	3:197	24,000
3,200	178	34.56	5,69,600	8.86	800	1:1	1,42,400
-	-	-	-	-	800	96:178	76,800
4,000	34	6.60	1,36,000	2.12	800	1:1	27,200
-	-	-	-	-	800	31:34	24,800
4,800	8	1.55	38,400	0.60	1,600	1:1	12,800
-	-	-	-	-	800	2:8	1,600
5,600	6	1.17	33,600	0.52	1,600	1:1	9,600
-	-	-	-	-	800	4:6	32,00
6,400	8	1.55	51,200	0.80	2,400	1:1	19,200
-	-	-	-	-	800	1:8	800
7,200	1	0.19	7,200	0.11	2,400	1:1	24,00
8,000	4	0.78	32,000	0.50	2,400	1:1	9,600
-	-	-	-	-	800	3:4	2,400
8,800	2	0.39	17,600	0.27	3,200	1:1	6,400
10,400	1	0.19	10,400	0.16	4,000	1:1	4,000
12,000	2	0.39	24,000	0.37	4,800	1:1	9,600
16,000	1	0.19	16,000	0.25	6,400	1:1	6,400
24,000	2	0.39	48,000	0.75	8,800	1:1	17,600
-	-	-	-	-	800	1:2	800
30,400	2	0.39	60,800	0.95	11,200	1:1	22,400
-	-	-	-	-	800	1:2	800
32,000	1	0.19	32,000	0.50	12,000	1:1	12,000
35,200	1	0.19	35,200	0.55	13,600	1:1	13,600
36,000	1	0.19	36,000	0.56	13,600	1:1	13,600
72,000	1	0.19	72,000	1.12	28,000	1:1	28,000
80,000	1	0.19	80,000	1.24	30,400	1:1	30,400
90,400	3	0.58	2,71,200	4.22	34,400	1:1	1,03,200
-	-	-	-	-	800	1:3	800
91,200	2	0.39	1,82,400	2.84	35,200	1:1	70,400
11,2000	1	0.19	1,12,000	1.74	43,200	1:1	43,200
3,68,000	1	0.19	3,68,000	5.73	1,41,600	1:1	1,41,600
6,05,600	3	0.58	18,16,800	28.27	2,32,800	1:1	6,98,400
18,18,400	1	0.19	18,18,400	28.30	6,99,200	1:1	6,99,200
Total	**515**	**100.00**	**64,26,400**	**100.00**	**24,69,600**	**-**	**24,69,600**

The Board of Directors of the Company at its meeting held on June 07, 2023, has taken on record the Basis of Allotment of Equity Shares, as approved by the Designated Stock Exchange viz. BSE and has authorized the corporate action for the allotment of the Equity Shares to various successful applicants.

The CAN-cum-Refund Orders and allotment advice and/or notices are being dispatched to the address of the Applicants as registered with the depositories as filled in the application form. Further, the instructions to Self Certified Syndicate Banks were being processed on June 07, 2023. In case the same is not received within 10 days, investors may contact at the address given below. The Equity Shares allocated to successful applicants are being credited to their beneficiary accounts subject to validation of the account details with the depositories concerned. The Company is taking steps to get the Equity Shares admitted for trading on the SME Platform of BSE Limited within Six working days from the date of the closure of the Issue. **The trading is proposed to be commenced on Monday, June 12, 2023 subject to receipt of final listing and trading approvals from the BSE.**

Note: All capitalized terms used and not defined herein shall have the respective meanings assigned to them in the Prospectus dated May 23, 2023 ("Prospectus").

INVESTORS PLEASE NOTE

The details of the allotment made has been hosted on the website of the Registrar to the Issue, **Cameo Corporate Services Limited at Website: www.cameoindia.com**

All future correspondence in this regard may kindly be addressed to the Registrar to the Issue quoting full name of the First/Sole Applicant, Serial number of the Application Form, Number of Shares Applied for and Bank Branch where the Application had been lodged and payment details at the address given below:

CAMEO CORPORATE SERVICES LIMITED
Subramanian Building, No. 1, Club House Road, Chennai – 600 002.
Tel.: +91 - 44 – 40020700 (5 Lines) **E-mail:** priya@cameoindia.com **Investor Grievance Email:**investor@cameodina.com **Website:** www.cameoindia.com
Contact Person: K. Sreepriya **SEBI Registration. No.:** INR 000003753

For, CFF Fluid Control Limited
On Behalf of the Board of Directors
Sd/-
Sunil Menon
Managing Director

Place : Mumbai
Date : June 09, 2023

LEVEL OF SUBSCRIPTION SHOULD NOT BE TAKEN TO BE INDICATIVE OF EITHER THE MARKET PRICE OF THE EQUITY SHARE ON LISTING OR THE BUSINESS PROSPECTS OF COMMAND POLYMERS LIMITED.

CFF Fluid Control Limited is proposing, subject to applicable statutory and regulatory requirements, receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to make a Public Issue of its Equity Shares and has filed the Prospectus with the Registrar of Companies, Mumbai. The Prospectus shall be available on the websites of the Company, the BSE and the Lead Manager at www.cffdefensys.com, www.bseindia.com and www.afsl.co.in respectively. Applicants should note that investment in equity shares involves a high degree of risk and for details relating to the same, see the Prospectus, including, the section titled "Risk Factors" beginning on page no. 20 of the Prospectus.

The Equity Shares have not been and will not be registered under the U.S. Securities Act of 1933, as amended (the "U.S. Securities Act"), and may not be offered or sold within the United States except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to, the registration requirements of the U.S. Securities Act and applicable U.S. state securities laws. Accordingly, the Equity Shares are being offered and sold (i) within the United States to persons reasonably believed to be qualified institutional investors (as defined in Rule 144A under the U.S. Securities Act) pursuant to Rule 144A under the U.S. Securities Act and (ii) outside the United States in offshore transactions in reliance on Regulation S under the U.S. Securities Act and applicable laws of the jurisdictions where such offers and sales occur.

Communicate India

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे तुरमाळे, तालुका-पनवेल, जिल्हा -रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री जनार्दन बाळू उर्फ बालू पाटील, रा.तुरमाळे शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीची असून आमचे अशिल हे खाली वर्णन केलेली जमिन नोंदणीकृत खरेदीखताने मालकी हक्काने कायमस्वरूपी विकत घेण्याचा विचार करीत आहेत.

वरीप्रमाणे परिशिष्ट
मौजे-तुरमाळे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड

सर्व्हे नं	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
जुना सर्व्हे नं.१०२ नवीन सर्व्हे नं.५१/३	०-२१-०० पो.ख.०-०१-०० ..... एकूण ०-२२-०	५.००

सर्व तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशिष्टातील वर्णन केलेली मिळकतीमधील हक्क, हितसंबंध व अधिकार आणि/किंवा इतर फायदे याबाबत ज्या कुणाची समझोता करार, साठेकरार, विकसन करार, फरोक्त विक्री, विनमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, चार्ज, वारसा हक्क, ट्रस्ट, न्यास ताबा, कुळ, वहिवाट, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबीद्वारे हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध असेल तर त्यांनी तशा प्रकारची हरकत तक्रार, दावा, हितसंबंध ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि.०७/०६/२०२३

सही/-
KISHOR A. DHAKAD
Advocate High Court
Advocate En Roll No. MAH/1913/2006
Office Add : Office No.21, First Floor,
Municipal Complex, Near Vasudev Balvant
Phedke Natyagruha, At-Panvel, Taluka panvel 410206
Mobile No 9867051330

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक काचन जगदीश माळी यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)
पेझारी ता.अलिबाग	६१/१/अ	१-४७-५० पो.ख.०-१०-०० एकूण १-५७-५०	२२.५६

वर नमूद केलेली मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

ॲड.गायत्री गोखले
मोबा नं. ९९६७८९४६३६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे सहाण, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.दिलीप लक्ष्मण नाईक रा. सहाण, पो. बामणगांब, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
सहाण ता. अलिबाग	३०/१		०-१४-७०	३.७१
		पो.ख.	०-००-४०	
		एकूण	०-१५-२०	

सबब सदरहू भातशेती मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०६/२०२३

सही/-
ॲड. मनोज परशुराम ओव्हाळ
पत्ता- दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग
ता.अलिबाग जि.रायगड
मो.९८८१२७७४४९

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.श्रावण प्रभाकर मोरजकर रा.गोरेगाव (पुर्व) यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांच्या विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतींचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र हे.आर. आर.चौ.मी)	आकार (रू.पै.)	विद्यमान मालक
खानाव, ता.अलिबाग	७०/१/ब	००.६३.७४ पो.ख.००.०५.८२ एकूण ००.६९.५६	१५.१२	श्री.श्रावण प्रभाकर मोरजकर रा.गोरेगाव (पुर्व)

या मिळकतीपैकी उत्तरेकडील श्री.श्रावण प्रभाकर मोरजकर यांच्या मालकीचे क्षेत्र ००.१६.०० आकार ०३.८० रू.पै.

या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात खाली सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे,
अलिबाग,
तारीख : ०८/०६/२०२३

(ॲड.सागर विजय पाटील)
पत्ताः मु.घर नं.१६०६
लालबाग, ब्राम्हण आळी,
ता.अलिबाग जि.रायगड
मो.नं.९९२२५६७८९१

निवडक

दिग्गजांचा विजय

पॅरिस : ब्राझीलच्या बीएट्रिझ हद्दाद माइआ आणि पोलंडच्या अग्रमानांकित इगा श्वीऑनटेकने फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतील महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. स्पेनच्या कार्लोस अल्कराझने आपली लय कायम राखताना पुरुष एकेरीची उपांत्य फेरी गाठली. माइआने ट्युनिशियाच्या ओन्स जाबेऊरवर विजय साकारला. या सामन्यात जाबेऊरचे पारडे जड मानले जात होते. मात्र त्याला धक्कादायक पराभव सहन करावा लागल्याने चाहते नाराज झाले.

कुस्तीपटूकडून तक्रार मागे

मुंबई : लैंगिक छळाचा आरोप करणाऱ्या ७ महिला कुस्तीपटूंपैकी एकमेव अल्पवयीन मुलीने तिचा आधीचा जबाब बदला आहे. आता त्यांनी नवीन जबाब नोंदवला आहे. आता अल्पवयीन मुलाच्या वडिलांनी न्यायालयात जाऊन आपले म्हणणे बदलण्याचा मुद्दा मान्य केला आहे.सीआरपीसी कलम १६४ अन्वये न्यायालयात जबाब नोंदवण्यात आला आहे. त्याने तक्रार मागे घेतली आहे.यामुळे या प्रकरणाला आता वेगळेच वळण लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

लक्षिताला सुवर्णपदक

नागपूर : दक्षिण कोरियातील येचॉन येथे आशियाई ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या लक्षिता शांडिल्यने मुलींच्या पंधराशे मीटर शर्यतीत सुवर्णपदक जिंकले. या स्पर्धेत भारताने तिसरे स्थान मिळविले. लक्षिताने ४ मिनिटे २४.२३ सेकंदांत पूर्ण केली. मुलींच्या ४-४०० मीटर रिले संघानेही सुवर्णपदकाला गवसणी घातली. यात महाराष्ट्राच्या अनुष्का कुंभार व रिया पाटीलचा समावेश आहे. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मेस्सीला मोठी ऑफर

बार्सोलोना : अर्जेंटिनाचा प्रख्यात फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने पीएसजीला सोडचिठ्ठी दिली असून तो आता इंटर मियामी क्लबकडून खेळण्याची शक्यता आहे. मेस्सीने सौदी अरेबियाची वर्षाला ३ हजार कोटी रूपये मोठी ऑफर नाकारल्याची चर्चा आहे. लिओनेल मेस्सीला नफ्यात हिस्सेदारी याचबरोबर आदिदास आणि ॲपल यांच्यासोबत करार देखील ऑफर करण्यात आला आहे अशी माहिती आहे.

रहाणेकडून उल्लंघन

लंडन : अजिंक्य रहाणेवर मैदानावर केलेल्या कृतीमुळे गंभीर आरोप केले जात आहेत. अजिंक्य रहाणेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. अजिंक्य रहाणेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे ज्यामध्ये तो आपल्या दोन्ही हातांवर थुंकताना दिसत आहे. हातावर थुंकल्यानंतर चेंडू उचलत असेल, तर आयसीसीच्या नियमांचे उल्लंघन होईल, असे चाहत्यांचे म्हणणे आहे.

आयपीएलने 'कसोटी' निष्प्रभ

खेळाडूंचे तंदुरुस्तीकडे दुर्लक्ष

। लंडन । वृत्तसंस्था ।

आयपीएलसारख्या व्यावसायिक स्पर्धांमुळे कसोटी सामन्याकडे खेळाडू तसेच प्रेक्षकांचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येऊ लागलेले आहे.याचा परिणाम कसोटी सामन्यातील खेळांवर होत आहे.झटपट पैसे कमाविण्याची सवय खेळाडूंना लागल्याने त्यांचे कसोटीसाठी तंदुरुस्त राहण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे जाणवत आहे.

इंडियन प्रीमियर लीग २००८ मध्ये सुरू झाली. आयपीएलचे ब्लॉकबास्टर यश, काही सामन्यांसाठी खेळाडूंना दिलेली मोठी रक्कम यामुळे क्रिकेटला सातासमुद्रापार नेले. जगातील सर्व देश फ्रँचायझी क्रिकेटचे आयोजन करत आहेत आणि मोठ्या रकमेसाठी आंतरराष्ट्रीय स्टार्सशी संपर्क साधत आहेत, त्यामुळेच खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रिकेटपेक्षा फ्रँचायझी क्रिकेटला महत्त्व देत आहेत. टी-२० मध्ये जास्तीत जास्त ४ षटके आणि १२० कायदेशीर चेंडू टाकल्याने ५ दिवसीय कसोटीची मज्जा कमी झाली आहे. बॉलीवूड चित्रपटाप्रमाणे ३ तासांत संपणाऱ्या सामन्यांमुळे केवळ कसोटीचा उत्साह कमी झाला नाही, तर टी-२० किंवा एकदिवसीय प्रकारात फिट होण्यासाठी खेळाडूंचा फिटनेसही कमी झाला आहे.



भारतीय खेळाडू आता दरवर्षी २ महिने दीर्घ कालावधीसाठी आयपीएल खेळतात. त्याचा परिणाम आता थेट भारतीय संघाच्या कामगिरीवर होत आहे. खेळाडू पैसे कमावण्यासाठी या लीगचा भाग बनतात आणि काहीवेळा जखमी होतात. याचा फटका आंतरराष्ट्रीय संघांना सहन करावा लागत आहे. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे केएल राहुल आणि केन विल्यमसन जे आयपीएल २०२३ मध्ये जखमी झाले होते. ऑस्ट्रेलिया यांच्यात विश्व कसोटी अजिंक्यपदाचा अंतिम सामना खेळवला आहे असे असतानाही बीसीसीआयने २ महिने आयपीएल आयोजित केले ज्यामध्ये सध्याच्या भारतीय संघातील जवळपास प्रत्येक खेळाडू भाग होता.

याचा परिणाम असा झाला की संघातील खेळाडूंना आयपीएलमधून सावरण्यासाठी वेळ मिळाला नाही आणि लंडनला येताच त्यांना पुन्हा सराव करावा लागला, त्यामुळे मोठ्या सामन्यापूर्वी ते तंदुरुस्त राहू शकले नाहीत.

आंतरराष्ट्रीय दर्जा घसरला

भारताने अखेरची चॅम्पियन्स ट्रॉफी २०१३ मध्ये महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली जिंकली होती. त्यानंतर भारताला एकही आयसीसी ट्रॉफी जिंकता आलेली नाही. याची अनेक कारणे आहेत. पण त्यापैकी एक आयपीएल देखील असू शकतो. कारण २०१३ नंतर हळूहळू आयपीएलची क्रेझ वाढत गेली. संघही वाढले आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा दर्जा कुठेतरी घसरला. त्यामुळे आयपीएलमुळे खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रिकेटवर पूर्णपणे लक्ष केंद्रित करू शकत नाहीत. तथापि बीसीसीआयने यावर थोडा विचार करावा आणि कोणत्याही मोठ्या स्पर्धेपूर्वी आयपीएल आयोजित होणार नाही याची काळजी घ्यावी लागणार आहे.

मैदानांअभावी अमेरिकेतील विश्वचषक स्पर्धेवर सावट

। वॉशिंग्टन । वृत्तसंस्था ।

विश्वकरंडक स्पर्धा संयुक्तपणे वेस्ट इंडीज आणि अमेरिकेत होणार आहे; परंतु आपल्याकडे अव्वल दर्जाचे क्रिकेट मैदाने नसल्यामुळे यजमानपदातून आपल्याला दूर केले जाईल, अशी भीती अमेरिका क्रिकेट संघटनेला वाटत आहे; परंतु मेजर क्रिकेट लीगचे यशस्वीपणे आयोजन करून आम्ही हा संभ्रम दूर करू, असे अमेरिका क्रिकेट संघटनेने स्पष्ट केले आहे.

अमेरिकेत होणारे सामने इतर ठिकाणी खेळवण्याचा विचार आयसीसी करत असल्याचे वृत्त प्रसिद्ध होत आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिका क्रिकेट संघटना जागरूक झाली आहे; परंतु आयसीसीकडून आपल्याकडे असे कोणतेही संकेत मिळालेला नाही किंवा कळवलेलेही नाही, असे अमेरिका क्रिकेट संघटनेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

विश्वकरंडक ट्वेन्टी-२० आयसीसीकडून आम्ही या संदर्भात काहीही ऐकलेले नाही, त्यामुळे आम्ही या ट्वेन्टी-२० विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी कोठेही कमतरता ठेवणार नाही, आवश्यक असलेल्या सर्व सुविधा आम्ही तयार करणार असल्याचा विश्वास या अधिकाऱ्याने व्यक्त केला.

अमेरिकेत क्रिकेटचे सामने सातत्याने होत नसतात, त्यामुळे केवळ क्रिकेटसाठी वापरण्यात येणारी स्टेडियम नाहीत. इतर खेळांच्या मैदानावर क्रिकेटचे सामने खेळवले जातात. तरीही आम्ही मेजर लीग टी-२० स्पर्धा आयोजित करणार आहोत आणि ती यशस्वीपणे पार पाडू, असा विश्वास या अधिकाऱ्याने व्यक्त केला. ही मेजर लीग टी-२० स्पर्धा १३ ते ३० जुलै दरम्यान होत आहे. या स्पर्धेत इंग्लंडचा स्टार खेळाडू जेसन रॉय, ऑस्ट्रेलियाचे ॲडम झॅम्पा, मॅथ्यू वेड, मार्कस स्टॉयनिस, मोझिस हेन्रिक्स असे खेळाडू खेळणार आहेत.लॉडेनहील (फ्लोरिडा) येथे आम्ही भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातील सामने आयोजित करून तेथील सुविधांची चाचणी अगोदरच केलेली आहे. त्यामुळे इतर ठिकाणीही कशा सुविधा करायला हव्यात याचा अंदाज आम्हाला आला आहे. येत्या काही महिन्यांत आम्ही सर्व ठिकाणी असे बदल करू, असेही अमेरिका क्रिकेट संघटनेच्या या पदाधिकाऱ्याने सांगितले. पुढील वर्षी होत असलेल्या टी-२० विश्वकरंडक स्पर्धेतील सामन्यांसठी ओकलँड, फ्लोरिडा आणि लॉस एंजलिस ही ठिकाणे निश्चित करण्यात आली आहे. वेस्ट इंडीजही सहयजमान असले तरी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना अमेरिकेतच खेळवला जाईल, असे सांगण्यात येत आहे.

कोहली पुन्हा चर्चेत

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार विराट कोहलीच्या कर्णधारपदाचा अनपेक्षित अंत झाला. प्रथम त्याने स्वतःच्या वर्कलोड कमी करण्यासाठी टी-२० कर्णधारपद सोडले होते. त्यानंतर बोर्डाने त्याच्याकडून वनडे संघाचे कर्णधारपद काढून घेतले होते.त्यावरुन आतापर्यंत मोठे वादविवाद झालेले आहेत.हाच मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.सध्या लंडन येथे सुरु असलेल्या विश्व कसोटी अजिंक्यपद सामन्यादरम्यान ऑस्ट्रेलियाचे माजी फलंदाज आणि मुख्य प्रशिक्षक जस्टिन लँगर यांनी समालोचनादरम्यान बीसीसीआयने कोहलीवर अन्याय केल्याचे विधान केल्याने सोशल मिडियावर वाद चिघळलला आहे.

दक्षिण आफ्रिकेतील कसोटी मालिका गमावल्यानंतर रागाच्या भरात विराटनेही कसोटी संघाचे कर्णधारपद सोडण्याचा निर्णय घेतला होता. दरम्यान त्याच्या आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली यांच्यातील वादाची बातमीही आली होती. जिथे विराटने कर्णधारपद सोडल्यानंतर मीडियासमोर येऊन दादांनी काही वक्तव्ये केली होती. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेला रवाना होण्यापूर्वी विराटने पत्रकार परिषदेतही भरभरून बोलून चर्चा वाढवली होती.

येथून वादाला सुरुवात झाली. विश्व कसोटी अजिंक्यपद सामन्यादरम्यान पुन्हा एकदा हा मुद्दा वर आला. यावेळी ऑस्ट्रेलियाचे माजी फलंदाज आणि मुख्य प्रशिक्षक जस्टिन लँगर यांनी हा मुद्दा उपस्थित केला. बीसीसीआयने कोहलीवर अन्याय केल्याचे त्याने अंतिम सामन्यातील समालोचनादरम्यान सांगितले.

जस्टिन लँगरच्या या विधानाने खळबळ उडाली आणि कोहलीचे चाहते पुन्हा सोशल मीडियावर सक्रिय झाले. असं असलं तरी, नाणेफेकीवर रोहित शर्माच्या निशाण्यावर आणि अश्विनला न पोसण्याचा निर्णय आल्याने विराट कोहलीच्या कर्णधारपदाची चर्चा आणखी सुरू झाली. असे अनेकदा घडते आणि विराट आणि रोहितचे चाहते समोरासमोर येतात.तसाच प्रकार आताही घडला आहे.

खोपोलीचा दिवेश पालांडे रायगड केसरी

। खोपोली । प्रतिनिधी ।

माधवीताई नरेश जोशी युवा प्रतिष्ठान, ईगल ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने भावी खासदार - रायगड केसरी स्पर्धा २०२३ चे भव्य आयोजन हातनोली - चौक येथील भव्य मैदानात करण्यात आले होते. या स्पर्धेत खोपोली येथील राजाराम कुंभार संचालित कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुलातील खेळाडूंचे निर्विवाद वर्चस्व राहिले.

रायगड केसरी होण्याचा पुरुष गटाचा पहिला मान दिवेश दत्तात्रय पालांडेयाला मिळाला तर उप रायगड केसरी याच संकुलातील ओमकार सदाशिव निंबळे हा ठरला. महिला गटात दिव्या भरत शिंदे हिने रायगड केसरी होण्याचा हा मान पटकावला तर उप विजेती पनवेलची अमेघा घरत ही ठरली. या स्पर्धेत कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुलातील कुस्तीगीरांनी सर्वच वयोगटातील वजनी गटात आपले प्राबल्य दाखवले.

कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुलाचे अध्यक्ष राजाराम कुंभार, सचिव - जगदिश मरागजे, क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, कुस्ती मार्गदर्शक विजय चव्हाण यांचे मोलाचे मार्गदर्शन खेळाडूंना लाभले आहे. तर सल्लागार देवदूत गुरुनाथ साठेलकर, दिनेश मरागजे, भरत शिंदे, संदीप पाटील, सुरेश चव्हाण, शरद ढवाळकर, समीर शिंदे, अमित विचारे, प्रवीण शेंद्रे यांचे सहकार्य लाभत असते. या स्पर्धेतील सर्व विजयी खेळाडूंचे जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष माजी आम. बाळराम पाटील, तालुका तालीम संघाचे अध्यक्ष सुनील पाटील, विभागीय सचिव मारुती आडकर, केटीएसपी अध्यक्ष संतोषजी जंगम जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष घासे, जितेंद्र सकपाळ, ज्ञानेश्वर सोगे, डॉ रणजित मोहिते, लायन्स क्लब खोपोलीच्या अध्यक्षा शिल्पा मोदी, माजी अध्यक्ष महेश राठी, खोपोली पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर इत्यादी मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

सविस्तर निकाल

१४ वर्षा खालील मुले : क्षितिजा मरागजे ४६ किलो गटात हिने प्रथम, प्रणाली घनवट ५४ किलो गटात प्रथम, आस्था मरागजे ३५ किलो गटात द्वितीय क्रमांक पटकवला.

१४ वर्षाखालील मुले - वेद दिनेश मरागजे ३५ किलो गटात प्रथम, सार्थक शिंदे ४० किलो गटात द्वितीय क्रमांक पटकवला.

१७ वर्षाखालील मुली : सई संजय शिर्के ४० किलो गटात प्रथम, तेजस्विनी शेंडे ४९ किलो गटात प्रथम, वैष्णवी कुंभार ५३ किलो गटात प्रथम क्रमांक

१७ वर्षा खालील मुलेः सोहेल शेख ५५ किलो गटात प्रथम, विघ्नेश ससे, ४५ किलो गटात द्वितीय, श्लोक धावळकर ५० किलो गटात द्वितीय क्रमांक पटकवला.

महिला रायगड केसरी गट :

पायल मरागजे ५० किलो गटात प्रथम, रोशनी परदेशी ५३ किलो गटात प्रथम, प्रांजली कुंभार ५७ किलो गटात प्रथम, प्राची भोईर हिने तृतीय क्रमांक पटकवला.

पुरुष रायगड केसरी गट

दिवेश पलांडे हा मानाच्या रायगड केसरी गदेचा विजेता तर ओमकार निंबळे उपविजेता ठरला तर याच गटात जयेश खरमारे याने उत्तम खेळाचे प्रदर्शन केले. उपविजेत्या ठरलेल्या ओमकार निंबळे यांने रायगड केसरी दिवेश पालांडे याला खांद्यावर उचलून घेत खिलाडू वृत्तीचे केलेले प्रदर्शन या स्पर्धेचे आकर्षण ठरले.

तिरंगा पतसंस्थेकडून आर्थिक मदत

। चिरनेर । वार्ताहर ।

चिरनेर येथील तिरंगा पतसंस्थेच्या सभासद अंबूबाई परशुराम पाटील यांचे वृद्धपकाळाने नुकतेच निधन झाले आहे. त्यामुळे पतसंस्थेच्या नियमानुसार त्यांच्या वारसांना तिरंगा पतसंस्थेच्या वतीने रोख दहा हजार रुपयांची आर्थिक मदत करून, अर्थसहाय्य केले आहे. चेअरमन अलंकार परदेशी, व्हाईस चेअरमन सुनील नारंगीकर यांच्या मुख्य उपस्थितीत वारसदार संजय पाटील यांना महेंद्र ठाकूर यांच्या हस्ते रोख दहा हजाराची रक्कम यावेळी संचालक श्रीधर मोकल, रवींद्र म्हात्रे, सुरेश म्हात्रे, बाळकृष्ण ठाकूर, प्रवीण म्हात्रे, मॅनेजर जगदीश ठाकूर, कर्मचारी चंद्रकांत गोंधळी, पिम्मी एजंट किरण कुंभार, आदीजण उपस्थित होते.

निवड चाचणी कबड्डी स्पर्धा पुणे,ठाण्यात

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.ने सर्व गटाच्या निवड चाचणी कबड्डी स्पर्धांचे ठिकाण जाहीर केले. वरिष्ठ गटाची स्पर्धा पुण्यात, तर कुमार गटाची ठाण्यात घेण्यास कार्यकारिणी समितीने मंजुरी दिली. विरोधी पक्ष नेते अजित पवार यांच्या कार्यालयात झालेल्या सभेत कबड्डीच्या हिताच्या दृष्टीने अनेक चांगले निर्णय घेण्यात आले.

यंदाचा कबड्डी दीन आणि गतवर्षापासून सुरू करण्यात आलेली बुवा साळवी यांच्या स्मृतीप्रीत्यार्थ घेण्यात येणारी स्पर्धा देखील ठाण्यात होणार आहे. किशोर गट कबड्डी स्पर्धा घेण्यास जिल्हा संघटना उत्सुक नसतात. त्यामुळे ज्या संघटनेस वरिष्ठ गटाची स्पर्धा देण्यात येईल त्या संघटनेने किशोर गट स्पर्धा घेणे बंधनकारक राहील. असा महत्त्वपूर्ण निर्णय या सभेत घेण्यात आला. त्यामुळे यंदा वरिष्ठ गटा बरोबर किशोर गट स्पर्धा देखील पुण्यात होईल.

प्रो-कबड्डीमुळे तरुणाई कबड्डी या खेळाकडे आकर्षित होऊ लागली आहे. त्यामुळे दिवसेंदिवस खेळाडूंची संख्या वाढत आहे. त्या खेळाडूंना खेळण्याची संधी उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्रातील अ व ब दर्जा असणाऱ्या महानगर पालिकेच्या हद्दीतील खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्याचा मानस संघटनेचे अध्यक्ष अजितदादा पवार यांनी व्यक्त केला होता. त्यास आज मंजुरी देण्यात येऊन त्याकरिता नियमावली तयार करण्याकरिता कमिटी गठित करण्यात आली.

यामुळे पुण्यातून २ तसेच उपनगर, ठाणे, नाशिक या जिल्हातून १-१ असे ५ संघ जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत वाढण्याची शक्यता आहे. या सभेत १० फेब्रुवारी रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर आणि स्पोर्टस् कोडवर सखोल चर्चा करण्यात आली. यावर अजितदादा पवार यांनी असे सुचविले की यावर कायदे विषयक सल्लागाराचा सल्ला घ्यावा. त्यानंतर यावर चर्चा करून ठोस निर्णय घ्यावा. पंचांचा दर्जा सुधारण्यासाठी दि. १८ ते २० जुलै २०२३ या कालावधीत शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, पुणे येथे शिबीर घेण्याचे ठरले.

त्याकरिता कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व खानदेश अशा ४ विभागात ती घ्यावी असे ठरले. तसेच संघटनेच्या रिक्त झालेल्या कार्यकारिणी समितीत कोल्हापूरच्या अण्णासो गावडे यांची नियुक्ती करण्यात आली. अशी माहिती एका परिपत्रकाद्वारे राज्य कबड्डी संघटनेचे नवनिर्वाचित सरकार्यवाह बाबुराव चांदेरे यांनी सर्व प्रसार माध्यमांना दिली.

वृद्धाश्रमात जन्मदिवस साजरा

। चिरनेर । वार्ताहर ।

रिटघर येथील आगरी, कोळी, कराडी संघर्ष समितीचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष भूषण भारत भोपी यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने, वृद्धाश्रमातील वृद्धांना विविध वस्तुंचे वाटप करण्यात आले. सांगरोली येथील जनाधर्म आधार गृह, नेरे येथील स्नेहबंध वृद्धाश्रम, मानघर येथील करुणेश्वर वृद्धाश्रम, चिंचवली मोरबे येथील वासल्य वृद्धाश्रम रीटघर येथील शिवाश्रय वृद्धाश्रम या ठिकाणी असलेल्या वृद्धाश्रमातील वृद्धाश्रमांना प्रत्यक्ष भेटी देऊन, तेथील आजी आजोबांसोबत आपला जन्मदिवस साजरा केला.

यावेळी वृद्धाश्रमातील आजी आजोबांच्या चेहऱ्यावर समाधानाचा आनंद दिसून येत होता.

याप्रसंगी सनीप कलोते, साईनाथ भोपी, यशवंत भिडे, विनायक शिंदे ,राजू मुंबईकर, संदेश घरत ,नरेश भोपी तसेच आदिवासी बांधव, त्यांची लहान मुले आणि भारत भोपी यांचे सहकारी मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)